पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी




रक्तदान महायज्ञ

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 15 ● 1 ऑगस्ट 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# ‘ऑपरेशन सिंदूर’ थांबवण्यासाठी पाकिस्तानने लोटांगण घातले

# काँग्रेस पाकिस्तानचीच भाषा बोलते आहे



## अध्यक्षीय मनोगत

# रक्तदानाचा महायज्ञ

आपल्या सर्वांचे नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस कोणत्या पद्धतीने साजरा करायचा याबाबतची चर्चा संघटना पातळीवर सुरू झाल्यानंतर हा दिवस रक्तदानाच्या माध्यमातून साजरा करण्याची कल्पना मांडली गेली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपला वाढदिवशी फलक, बॅनरबाजी करू नये, असे आवाहन जाहीरपणे केले होते. सर्व कार्यकर्त्यांना तसा संदेशही पाठवण्यात आला होता. फलक लावण्यासारख्या गोष्टींवर उधळपट्टी करण्याऐवजी तोच पैसा समाजोपयोगी उपक्रमासाठी वापरावा, असेही मुख्यमंत्र्यांनी पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सांगितले होते. राज्यभर एकाच दिवशी रक्तदानाचे कार्यक्रम घेण्याचे निश्चित झाल्यानंतर त्यानंतरची तयारी करण्यास कमी वेळ होता. तरीही आपल्या संघटनेने अत्यंत कमी वेळात रक्तदान महायज्ञाची तयारी केली. २२ जुलै रोजी सुमारे ७८ हजार युनिट एवढे रक्त संकलित करून भारतीय जनता पार्टीच्या संघटनेने विक्रम केला. २२ जुलै नंतरही अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्या अर्थाने आपण सुमारे १ लाख युनिट ऐवढे रक्त संकलित केले. आपल्या रक्तादानाच्या विक्रमाची 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'ने दखल घेत भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशचा प्रशस्तीपत्र  देऊन गौरव केला. या विक्रमाचे संपूर्ण श्रेय आपल्या पक्षाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे आहे. या कार्यकर्त्यांच्या वतीनेच मी 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'चा गौरव स्वीकारला. प्रदेश अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर हा पहिलाच कार्यक्रम होता. अशा कार्यक्रमातून संघटनेची ताकद कळते. लवकरच होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीसाठी संघटनेच्या विविध स्तरावरील बैठका सध्या सुरू आहेत. सर्व जिल्हाध्यक्ष, माजी खासदार, माजी आमदार यांच्या बैठकांमधून आगामी निवडणुकांच्या दृष्टीने संघटना बांधणीविषयी सखोल विचारमंथन झाले. या निमित्ताने संघटना म्हणून कोणत्या मुद्यांवर आपल्याला लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे, याचा आढावा घेण्यात आला.

पहलगाममधील दहशतवाद्यांच्या हल्ल्यानंतर भारतीय सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर'करून पाकिस्तानातील दहशतवादी तळ, दहशतवाद्यांची प्रशिक्षण केंद्रे उध्वस्त करून टाकली. या कारवाईत भारतीय सैन्यदलाने नागरी वस्तीवर हल्ला केला नव्हता. असे असतानाही पाकिस्तानच्या लष्कराने आपल्या देशातील नागरी वस्तींवर क्षेपणास्त्र हल्ले करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानचे हे सर्व हल्ले आपल्या सैन्यदलाने विफल ठरवले. 'ऑपरेशन सिंदूर'वरील चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत सविस्तर उत्तर दिले आणि विरोधकांचे आरोप खोडून काढले. पंतप्रधान मोदी यांचे लोकसभेतील भाषण आपल्या सारख्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने प्रेरणादायी होतेच, त्याशिवाय हे भाषण अत्यंत माहितीपूर्ण होते. सर्व कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधानांचे हे भाषण आवर्जुन ऐकले पाहिजे, वाचले पाहिजे. 'मनोगत'च्या या अंकात पंतप्रधानांचे हे भाषण सविस्तर स्वरूपात देण्यात आले आहे. समाजात वावरताना अशा गोष्टींबद्दल गावपातळीवर कार्यकर्त्यालाही सरकारची बाजू योग्य पद्धतीने, अचूक माहितीच्या आधारे मांडता आली पाहिजे. केंद्र सरकारने सर्वसामान्य माणसांसाठी परवडणाऱ्या दरात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेल्या निर्णयांची माहितीही या अंकात दिली आहे. ही माहिती कार्यकर्त्यांनी जरूर वाचली पाहिजे.

**रवींद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर–वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे


काँग्रेसची भाषा पाकिस्तानसारखी ०४



काळाची गरज पूर्ण करणारा कायदा ०८



दरवाढ नव्हे दरकपात – वीज ग्राहकांना सुखद धक्का ११



ब्रिटन बरोबरच्या मुक्त व्यापार करारामुळे काय फायदे होणार? १४



आरोग्य सेवेचा चेहरामोहरा बदलणारी 11 वर्षे १६



डिजिटल इंडियाचे एक दशक २४



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२–२२०२२०५०

# काँग्रेसची भाषा पाकिस्तानसारखी

● नरेंद्र मोदी, पंतप्रधान

लोकसभेत 'ऑपरेशन सिंदूर'वरील चर्चेस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २९ जुलै रोजी उत्तर दिले. यावेळी पंतप्रधानांनी 'ऑपरेशन सिंदूर', 'ऑपरेशन महादेव', भारताचे परराष्ट्र धोरण यावर भाष्य करून काँग्रेसचे वाभाडेही काढले. पंतप्रधान मोदी यांच्या भाषणाचा संपादित अंश.

**आज** आपण भारतीय लष्कराच्या ऐतिहासिक कामगिरीचा विजयोत्सव साजरा करण्यासाठी एकत्र आलो आहोत. भारतीय सैन्य दलाने 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये अत्युच्च शौर्य दाखवत सीमे पलीकडेचे दहशतवाद्यांचे तळ नष्ट करून टाकले. ही कारवाई झाल्यानंतर भारताने आपली भूमिका स्पष्टपणे जगापुढे मांडली होती. पहलगाम हत्याकांड घडवणाऱ्या दहशतवाद्यांना पाठबळ देणारे अड्डे उद्ध्वस्त करण्यापुरती ती कारवाई मर्यादित होती, असे निवेदन भारतीय लष्करातर्फे त्यावेळी प्रकाशित करण्यात आले होते. पहलगाम येथे धर्म विचारून निरपराध नागरिकांची निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्याकांडाच्या माध्यमातून भारतात धार्मिक हिंसाचार माजवण्याचा कट होता. मात्र भारतीय जनतेने हा कट उधळून लावला. या हत्याकांडाच्या पडद्यामागील सूत्रधारांना कल्पनेपेक्षाही भयंकर शिक्षा करू, असे भारत सरकारने त्यावेळी स्पष्ट केले होते. आमच्या सरकारचा भारतीय लष्करावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळेच पहलगाम हत्याकांडाला कसे उत्तर द्यायचे याचे पूर्ण स्वातंत्र्य केंद्र सरकारने आपल्या लष्कराला दिले होते.




२२ एप्रिल रोजी घडलेल्या पहलगाम हत्याकांडाचा बदला आपल्या सैन्य दलाने अवघ्या २२ मिनिटांत पाकिस्तानातील दहशतवादी तळ नष्ट करून घेतला. पाकिस्ताने ज्या ठिकाणी दहशतवाद्यांना आणि त्यांच्या म्होरक्यांना दडवून ठेवले होते त्या ठिकाणी भारत हल्ला चढवेल, अशी कल्पनाही पाकिस्तानने केली नव्हती.पहलगाम हत्याकांड घडवणाऱ्या सूत्रधारांचे तळ नष्ट करण्यापुरतीच ६-७ मे रोजी केलेली कारवाई मर्यादित होती, असे भारताने त्यावेळी स्पष्ट केले होते.

'ऑपरेशन सिंदूर'मुळे दहशतवाद्यांना पोसणाऱ्या शक्तींमध्ये घबराट पसरली आहे. आपण पाकिस्तानात कुठेही लपलो तरी भारतीय सैन्य दल आपल्याला शोधून काढेल आणि हल्ला करेल, अशी भीती दहशतवाद्यांना वाटू लागली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारतीय सैन्य दलाने केलेले हल्ले अतिशय अचूक होते. या हल्ल्यांमध्ये आपल्याला जे साध्य करायचे होते ते साध्य झाले. १० मे रोजी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' तात्पुरते थांबवले. पाकिस्तानने गुडघे टेकवून हे हल्ले थांबवण्याची याचना भारतापुढे केली होती. जगातील कोणत्याही देशाने 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्यास सांगितले नव्हते, हे मी या

यापूर्वी २०१६ आणि २०१९ मध्येही पाकिस्तानच्या दहशतवादी प्रशिक्षण केंद्रांवर हल्ले चढवण्यात आले होते. यावेळी पाकिस्तानला आपल्या ज्या दहशतवादी अड्ड्यांवर हल्ले होती, अशी अपेक्षा नव्हती. त्या केंद्रांवर भारतीय सैन्य दलाने हल्ले केले.



**देशावरील हल्ल्याचे मुद्याचेही राजकारण करण्याचा करंटेपणा काँग्रेस नेतृत्वाने वारंवार केला आहे. २०१९ मध्ये हवाईदलाचा पायलट अभिनंदन वर्धमान पाकिस्तानी लष्कराच्या तावडीत सापडल्यानंतर त्यावरून आमच्या सरकारला घेरण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला.**



**मात्र आमच्या सरकारने अभिनंदनला सुखरूप सोडवून आणले. पहलगाम हल्ल्यानंतरही सीमा सुरक्षादलाचा जवान पाकिस्तानच्या तावडीत सापडला होता, त्यावेळी आमच्या विरोधकांना आनंदाच्या उकळ्या फुटल्या होत्या. आता तरी मोदी सरकारला अडचणीत आणू, अशी स्वप्ने आमच्या विरोधकांना पडू लागली. आता मोदींची फजिती होणार असे आमच्या विरोधकांना वाटु लागले. सोशल मीडियावर या मुद्यावरून आमच्या सरकारवर बेताल आरोप करण्यात आले. मात्र या जवानालाही आमच्या सरकारने सुखरूप परत आणले. आपल्या लष्कराने केलेल्या कारवाईनंतर दहशतवादी घाबरून गेले. त्यामुळे आमच्या विरोधकांना आनंद होण्याऐवजी रडू आले. 'ऑपरेशन सिंदूर' थांबविल्यानंतर ही कारवाई का थांबवली, असा प्रश्न आमचे विरोधक करू लागले. आमच्या सरकारला विरोध करण्याचे काँग्रेस आणि अन्य पक्षांना निमित्तच हवे असते, अशा मुद्यावर सरकारच्या पाठीमागे उभे राहणे, हे विरोधी पक्षांचे कर्तव्य असते. मात्र काँग्रेस आणि काही पक्ष पाकिस्तान आणि दहशतवाद्यांची भाषा बोलत आहेत.**

सभागृहाला मुद्दाम सांगू इच्छितो. भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' थांबवल्याबाबतची भूमिका पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली होती, तरीही काही पक्षांनी याबाबत टीका-टिप्पणी केली. यातून हे पक्ष पाकिस्तानची भाषा बोलत असल्याचे सिद्ध झाले. दहशतवाद्यांना पाठिशी घालण्याचे धोरण पाकिस्तान सरकारने चालूच ठेवल्याने भारताला ९ आणि १० मे रोजी पुन्हा कारवाई करावी लागली. या हल्ल्याने पाकिस्तानची भीतीने गाळण उडाली. पाकिस्तानच्या डीजी एम.ओ ने भारतीय लष्कराशी थेट संपर्क साधत आता कारवाई थांबवण्याची विनंती केली. आणखी हल्ले सहन करण्याची ताकद आमच्याकडे नाही, असेच पाकिस्तानच्या विनंतीतून दिसले. भारताने दहशतवाद्यांविरोधात केलेल्या कारवाईला जगातील एकाही देशाने, एकाही राष्ट्र प्रमुखाने आक्षेप घेतला नव्हता. ९ आणि १० मे रोजी भारतीय लष्कराने केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानच्या लष्कराचे अनेक तळ उद्ध्वस्त झाले. पाकिस्तानने यापुढेही दहशतवाद्यांना पाठिंबा देणे चालूच ठेवले तर याही पेक्षा कठोर शिक्षा त्यांना मिळेल. 'ऑपरेशन सिंदूर' संपलेले नाही. ते चालूच आहे, हे मी या सभागृहाला सांगू इच्छितो. बलशाली आणि



भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ अचूकपणे उद्ध्वस्त केले. दहशतवादी तळांवर हल्ले करताना नागरी वस्तीचे नुकसान होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेण्यात आली होती.

आत्मनिर्भर भारत कसा असतो हे 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे आपण साऱ्या जगाला दाखवून दिले आहे.

भारतावर दहशतवादी हल्ला केल्यास केवळ दहशतवादीच नव्हे तर पाकिस्तानसह त्यांचे आकाही आता सुरक्षित नाहीत, हे भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे सिद्ध केले आहे. त्यामुळे भारत आता आपल्या पद्धतीने दहशतवाद संपवतो हे 'सिंदूर ते सिंधू' असा प्रचंड मोठा आवाका असलेल्या सैन्यमोहिमेद्वारे सिद्ध केले असून त्याची दहशत पाकला बसली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर तातडीने उच्चस्तरीय बैठक घेऊन सुरक्षादलांना कारवाई करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले होते. भारतीय सैन्यदलांनी अभुतपूर्व समन्वय आणि सामर्थ्य दाखवून २२ एप्रिलच्या हल्ल्याचा बदला अवघ्या २२ मिनिटात घेतला. पाकच्या कानाकोपऱ्यात असलेल्या दहशतवादी प्रशिक्षण तळांवर अचूक हल्ले करून पहलगाम हल्ल्याची आखणी करणाऱ्या आकांना धुळीस मिळवले. भारताच्या अतिशय सामर्थ्यशाली अशा हल्ल्यांपुढे पाक काहीही करू शकला नाही. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकच्या अणूधमकीचीही हवाच निघून गेली आहे. यापूर्वी दहशतवादी हल्ले केल्यानंतर दहशतवाद्यांचे आका निर्धास्त असत. मात्र, भारताच्या कारवाईचा 'सिंदूर ते सिंधू' असा आवाका बघून दहशतवाद्यांच्या आकांना आता झोप लागत नाही. हेच भारताने घालून दिलेले 'न्यू नॉर्मल' आहे.

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'ला जगातील एकाही देशाने विरोध केला नाही. संयुक्त राष्ट्रसंघात १९८ पैकी केवळ ३ देशांनीच पाकच्या समर्थनार्थ वक्तव्य केले. त्याचवेळी ब्रिक्स, क्वाड ते रशिया, जर्मनी, फ्रान्ससह जगातील सर्व देशांनी भारतास पाठिंबा दिला. मात्र, दुर्दैवाची बाब म्हणजे काँग्रेसचा पाठिंबा मात्र भारतास मिळाला नाही. काँग्रेसने छछोरपणा दाखवून भारतीय सैन्याचे मनोबल नष्ट करण्याचा प्रयत्न केला. भारताने आपले लक्ष्य साध्य झाल्यावर कोणत्याही देशाच्या दबावाशिवाय ऑपरेशन स्थगित केले. त्याविरोधात पाकिस्तानकडून खोटा प्रचार करण्यात आला आणि काँग्रेसनेही तोच नॅरेटिव्ह पसरविण्यात आघाडी घेतली. एकीकडे देश आत्मनिर्भर होऊन वेगवान आगेकूच करत असताना काँग्रेस मात्र पाकनिर्भर होत आहे. काँग्रेसवर पाकचे मुद्दे आयात करण्याची वेळ आली असून पाकच्या षड्यंत्राच्या प्रवक्तेपणाची भूमिका काँग्रेस पार पाडत आहे.

'ऑपरेशन महादेव'द्वारे पहलगामच्या हल्लेखोरांनी भारतीय सुरक्षादलांनी ठार केले आहे. मात्र, कालपर्यंत पहलगामच्या दहशतवाद्यांचे काय; असा प्रश्न विचारणारे आज मात्र 'आताच हे ऑपरेशन कसे झाले' असे प्रश्न विचारत आहेत.

## सैन्यविरोध ही काँग्रेसची जुनी भूमिका

सैन्यास विरोध करण्याची आणि नकारात्मकता पसरविण्याची काँग्रेसची जुनी भूमिका आहे. सत्तेत असताना काँग्रेस सरकारने कधीही कारगिल विजय दिन साजरा केला नाही, त्या विजयास काँग्रेसने अजुनही स्वीकारलेले नाही. डोकलाम प्रकरणातही भारतीय सैन्य चीनला धडा शिकवत असताना काँग्रेस नेते चीनी राजदूताकडून ब्रिफींग घेत होते.

## पहलगाम हल्ला घडविणाऱ्यांचा खात्मा 'ऑपरेशन महादेव' यशस्वी

सुरक्षा दलांनी राबविलेल्या 'ऑपरेशन महादेव' मध्ये पहलगाम हल्ला करणारे सुलेमान, अफगान आणि जिब्रान हे तिन्ही दहशतवाद्यांना ठार करण्यात आले, अशी माहिती गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत दिली. ते म्हणाले, भारतीय लष्कर, केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी 'ऑपरेशन महादेव' राबवून पहलगाम हल्ला घडविणाऱ्या लष्कर-ए-तोयबाच्या तिन्ही दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. ठार केकेल्या दहशतवाद्यांमध्ये लष्कर-ए-तोयबाचा ए-ग्रेड कमांडर सुलेमान उर्फ फैसल, लष्कर-ए-तोयबाचा ए-ग्रेड दहशतवादी अफगाण आणि लष्कर-ए-तोयबाचाच आणखी एक धोकादायक दहशतवादी जिब्रान याचा समावेश होता. हे तिघेही दहशतवादी बैसरन खोऱ्यात नागरिकांच्या हत्येत सहभागी होते. सुरक्षा दलांनी केलेल्या कठोर परिश्रमानंतर त्यांना ठार करण्यात आल्याचे केंद्रीय गृहमंत्र्यांनी सांगितले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी आपल्या भाषणात 'ऑपरेशन महादेव'ची सविस्तर माहिती दिली. ते म्हणावे, पहलगाम हल्ल्यानंतर तातडीने सुरक्षादलांची उच्चस्तरीय बैठक घेऊन त्यांना कोणत्याहील परिस्थितीत दहशतवाद्यांना पाकमध्ये परत जाता येऊ नये, आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, भारतीय लष्कर, राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनएआयए), सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी आपल्या कारवाईस सुरुवात केली होती. त्यानंतर इंटेलिजन्स ब्युरोद्वारे (आयबी) २२ मे रोजी दाचिगाम क्षेत्रात दहशतवादी लपल्याचे समजले. या माहितीची खात्री करण्यासाठी २२ मे ते २२ जुले या कालावधीत दहशतवाद्यांकडे असलेल्या चिनी बनावटीच्या उपकरणांचे सिग्नल्स टिपण्यासाठी सुरक्षा दलांचे जवान कार्यरत होते. अखेर २२ जुलै रोजी हे तेच दहशतवादी असल्याची खात्री झाली आणि त्यानंतर सुरक्षादलांनी 'ऑपरेशन महादेव' राबवून त्यांचा खात्मा केल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिली.

### आमचा वारसा छत्रपती शिवरायांचा

शांतता हीच भारताची भूमिका आहे. मात्र, शांतता आणि समृद्धीचा मार्ग सामर्थ्यातूनच येतो. छत्रपती शिवाजी महाराज, राजेंद्रल चोल, सुहेलदेव ते महाराजा रणजितसिंग यांचे आम्ही वारसादार आहोत. 'ऑपरेशन सिंदूर' हे अजुनही सुरूच असून पाकच्या कोणत्याही आगळीकीस भयावह उत्तर देण्यास भारतीय सैन्यदले सज्ज आहेत.

### लांगुलचालनासाठी 'भगवा दहशतवाद'

मुंबईतील २६/११ हल्ल्यामधील एक दहशतवादी पकडला जाऊन संपूर्ण जगात पाकला रोषाचा सामना करावा लागत होता. मात्र, त्याचवेळी लांगुलचालनासाठी काँग्रेसने 'भगवा दहशतवाद' संकल्पना मांडून हिंदूंना दहशतवादी ठरविण्याचा डाव मांडला होता. बाटला हाऊस चकमकीत दहशतवादी मारल्यानंतर काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांच्या डोळ्यात पाणी आल्याचे सांगण्यात आले होते.

### जागतिक शांततेसाठी भारताची संरक्षण आत्मनिर्भरता महत्त्वाची

'ऑपरेशन सिंदूर'मध्ये स्वदेशी शस्त्रे आणि प्रणालींनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पाकच्या जवळपास हजारभर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ल्यास भारतीय हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच पालापाचोळ्याप्रमाणे उडवून लावले. भारताची संरक्षण उत्पादनातील क्षमता यामुळे सिद्ध झाली असून जगातील संरक्षण बाजारपेठ आता भारतासाठी खुली झाली आहे. सध्याच्या जगाचा विचार करता भारताने संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होणे हे जागतिक शांततेसाठी महत्त्वाचे आहे.

### एका कुटुंबाचा दबाव झुगारू टाका - पंतप्रधानांचे काँग्रेस खासदारांना आवाहन

भारतीय सर्वपक्षीय शिष्टमंडळांनी जगातील विविध देशांमध्ये जाऊन 'ऑपरेशन सिंदूर' आणि भारताची भूमिका अतिशय समर्थपणे मांडली. त्यामध्ये काँग्रेसच्या खासदारांचाही समावेश होता. मात्र, त्यावरून काँग्रेसच्या एका बड्या नेत्यास पोटदुखी सुरू झाली असून त्या सदस्यांना सभागृहात बोलू दिले नसल्याचे समजते. मात्र, एका कुटुंबाच्या दबावाखाली येऊन पाकला क्लीन चीट देण्याचा प्रकार काँग्रेसच्या सदस्यांनी बंद करावा. ■

# काळाची गरज पूर्ण करणारा कायदा

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> ‘महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक २०२४’ विधानसभेत बहुमताने मंजूर झाल्यानंतर ज्यांच्या छुप्या कारवायांना खरा धोका निर्माण झाला आहे अशा काही गटांनी ह्या कायद्याविरुद्ध अपप्रचाराचा गदारोळ सुरु केला आहे. वास्तविक, हा कायदा काही आज अचानक समोर आलेला नाही.

**गेल्या** वर्षी, डिसेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात, सरकारने हे विधेयक मांडले होते. विरोधकांचा आग्रह लक्षात घेऊन ते घाईघाईने मंजूर न करता चिकित्सा समितीकडे पाठवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्याप्रमाणे गेल्या सहा महिन्यात त्या विधेयकावर साधक बाधक चर्चा झाली. मूळ मसुद्यातील तरतुदींबद्दल १२,५०० हरकती किंवा सूचना नोंदवल्या गेल्या. त्या सर्वांचा अभ्यास करून मूळ मसुद्यात काही बदलही केले गेले. विधानसभेतही त्या विधेयकावर पूर्ण चर्चा झाली. येणाऱ्या काही दिवसांमध्ये विधान परिषदेत चर्चा होणार आहे. त्यामुळे ह्या विधेयकाबद्दल, प्रस्तावित कायद्याबद्दल ज्यांना ज्यांना काही म्हणणे मांडायचे होते त्या सर्वांना पूर्ण संधी मिळालेली आहे शिवाय कायदा मंजूर झाल्यानंतरही त्याला न्यायालयात आव्हान देण्याचा मार्ग खुला आहे. लोकशाही यंत्रणेमधील सर्व व्यवस्था, प्रथा, परंपरा पाळून हा कायदा अस्तित्वात येत आहे. विशेष म्हणजे आज जे विरोधक ह्या कायद्याला रस्त्यावर उतरून विरोध करायची भाषा करत आहेत ते विधिमंडळात




मात्र गप्प होते. म्हणजे जिथे आपला विरोध नोंदवणे त्यांचे कर्तव्य होते, तिथे ते गप्प बसले आणि आता रस्त्यावर उतरण्याची भाषा वापरत आहेत. त्यासाठी त्यांनी चालवलेला अपप्रचार व वापरत असलेली विखारी भाषा पुरेशी बोलकी आहे. गेली अनेक दशके वापरली जात असलेली ही भाषा, ती वापरणारे गट व त्यांच्या दहशतवादी कारवाया यांच्यामुळेच असा कायदा करण्याची गरज निर्माण झाली होती. जे गट किंवा संघटना ह्या कायद्याला इतका विरोध करत आहेत त्यांचा इतिहास थोडा तपासून बघितला तरी हा मुद्दा स्पष्ट होईल.

उदाहरणादाखल मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी (CPI-M) हा कायदा मागे घेण्याची मागणी करत आहे. हा पक्ष मूळ कम्युनिस्ट पार्टीमधून फुटून वेगळा होण्यापूर्वी, १९६२ साली पं.नेहरूंच्या काँग्रेस सरकारने त्याच्यावर बंदी घातली होती. आरोप होता, भारतावर आक्रमण करणाऱ्या चीनला छुप्या व खुल्या पद्धतीने मदत करत



विविध समुदायांना, जाती-धर्माच्या लोकांमध्ये अफवा पसरवून वैमनस्य निर्माण करण्याचे काम शहरी नक्षलवादी सातत्याने करतात. अशा प्रवृत्तींना चाप लावण्यासाठी जनसुरक्षा कायद्यात आवश्यक त्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

असल्याचा! चीनने आक्रमण केल्यानंतर संरक्षण साहित्य निर्मिती करणाऱ्या कारखान्यांमध्ये आणि भारतातील रेल्वेमध्ये कम्युनिस्ट कामगार संघटनांनी संप करून देशाच्या सुरक्षा प्रयत्नांना खीळ घालण्याचा उद्योग केला होता. चीनला मदत करणे हाच त्यामागील थेट हेतू होता आणि हा आरोप खुद्द पं.नेहरूंनी केला होता. ह्या संदर्भात तेव्हाचे केंद्रीय गृहमंत्री गुलजारीलाल नंदा ह्यांनी १८ फेब्रुवारी १९६५ रोजी एक विस्तृत निवेदन करून अनेक तपशील संसदेच्या समोर मांडले होते. 'चीनच्या आदेशानुसार चालायचे की रशियाच्या आदेशा नुसार' ह्या मुद्यावरच भारतातल्या कम्युनिस्ट पार्टीमध्ये फूट पडली होती. चीनबरोबर घनिष्ठ संबंध ठेवून काम करणारा गट ज्योती बसू, हरकिशन सिंग सुरजित, बी.टी.रणदिवे, ए.के.गोपालन इत्यादी नेत्यांच्या पुढाकाराने मूळ पार्टीमधून बाहेर पडला व त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पार्टी-मार्क्सिस्ट (CPI-M) हा पक्ष स्थापन केला. ही फूट सुद्धा चीनच्या मार्गदर्शनानुसारच पडली होती असा आरोपही नंदा ह्यांनी त्या निवेदनात केला होता. ('पेकिंगवादी कम्युनिस्टांच्या राष्ट्रविघातक हालचाली आणि घातपाती व हिंसक कृत्ये करण्यासाठी त्यांनी केलेली तयारी' १८ फेब्रुवारी १९६५ रोजी केंद्रीय गृहमंत्र्यांनी संसदेपुढे केलेले निवेदन, प्रकाशक - भारत शासन, गृह मंत्रालय )

स्वत:ला 'नक्षलसवादी' म्हणवून आपण क्रांतिकारक आहोत असा खोटा आव आणणारे व त्या बुरख्याखाली दहशतवादी कारवाया करत राहणारे आपल्या देशातील विविध छोटेमोठे गट व लहानमोठ्या संघटना चीनधार्जिण्या आहेत हे काही रहस्य किंवा गुपित राहिलेले नाही. १९६७ साली जेव्हा ह्या दहशतवादी कारवाया सुरु झाल्या तेव्हाच त्या चीनच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली सुरु झाल्या होत्या हेही जगजाहीर आहे. त्या सुरु करणाऱ्यांपैकी कनू संन्याल व जंगल संथाल चीनमध्ये जाऊन माओने सुरु केलेल्या Marxism and Leninism Academy मध्ये चार महिने राहून प्रशिक्षण घेऊन आले होते. माओने ही संस्था जगातल्या विविध देशांमधील कम्युनिस्टांना गनिमी युद्ध आणि भूमिगत हिंसक कारवायांचे प्रशिक्षण देण्यासाठी काढली होती. आजही अनेक कम्युनिस्ट गट, विशेषत: जे सांसदीय लोकशाही मान्य न करता हिंसक मार्गांचाच वापर करतात, ते स्वत:ला 'माओवादी' म्हणवून घेतात.

'भारताच्या अंतर्गत सुरक्षेला सर्वात मोठा धोका नक्षलवादाचा आहे, Naxalism is the greatest internal security threat to our country' असे उद्गार माजी पंतप्रधान कै.डॉ.मनमोहन सिंग ह्यांनीच ११ ऑक्टोबर २००९ रोजी काढले होते. ज्या गटांच्या विघातक कारवायांमुळे डॉ.मनमोहन सिंग ह्यांनी हे वक्तव्य केले होते तेच गट आज ह्या कायद्याला निकराचा विरोध करत आहेत. कारण हा कायदा त्यांच्या कारवायांना पायबंद घालणारा कायदा आहे.

भारतातील सुमारे १२ राज्यांमध्ये नक्षलवाद्यांनी

आजवर प्रचंड प्रमाणात हानी केली आहे. त्यात महाराष्ट्र सुद्धा आहे. अशा राज्यांपैकी छत्तीसगड, ओडिशा, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या नक्षल प्रभावित राज्यांमध्ये नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी स्वतःचा विशेष कायदा आहे. महाराष्ट्रामध्ये मात्र अद्याप असा विशेष कायदा नव्हता. अंतर्गत सुरक्षेला धोका ठरणाऱ्या संघटना आणि व्यक्तींविरोधात कारवाई करताना महाराष्ट्रातील पोलिसांना युएपीए, टाडा किंवा पोटासारख्या केंद्र सरकारच्या कायद्यांचा आधार घ्याला लागतो. पण तसे करताना अनेक प्रशासनिक अडथळे येतात. त्यामुळे नक्षलवादी किंवा त्यांना मदत करणाऱ्यांच्या विरोधात प्रभावी कारवाई करताना अडचणी येत होत्या.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात अर्बन किंवा शहरी नक्षलवादाची समस्या गंभीर बनली आहे. यामध्ये पांढरपेशा, बुद्धीजीवी वर्गाचा वाढता सहभाग चिंताजनक आहे. आक्रमक व हिंसक आंदोलने करणे, सोशल मीडिया वापरून देशविरोधी, लोकशाहीविरोधी विचारसरणी पसरवणे, पर्यायाने अस्थिरता निर्माण करणे यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य या राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाराचा हुकमी वापर केला जातो. ह्या सगळ्या जनहित विरोधी कारवाया रोखण्यासाठी ह्या कायद्याची निर्मिती करावी लागत आहे.

'हा कायदा केंद्र सरकारच्या UAPA ह्या कायद्याची नक्कल आहे' असा आक्षेप काही टीकाकार घेत आहेत. ते ज्या कायद्याचा उल्लेख करत आहेत तो कायदा १९६७ साली काँग्रेस सरकारने केलेला कायदा असून त्यात संख्येने सर्वाधिक व कडक दुरुस्त्या २००९ साली, डॉ.मनमोहन सिंग ह्यांच्या कारकिर्दीत केल्या गेल्या. आज आरडा ओरडा करणारे सर्वजण त्यावेळेला मात्र गप्प होते. आज जे विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य वगैरे शब्द वापरत आहेत ते १९७५ साली, आणीबाणीच्या काळात कुठे होते? काय करत होते? त्यामुळे आज ह्या कायद्याला होत असलेला विरोध निव्वळ मतलबी आहे.

आज अशा कायद्याची अत्यंत गरज निर्माण झाली होती. कारण आज महाराष्ट्र 'विकसित महाराष्ट्र' बनण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करत आहे. आर्थिक विकासाला चालना देताना राज्यात कायदा सुव्यवस्था उत्तम असावी लागते. राज्यातील विद्यमान उद्योजकांच्या मनात सरकारबद्दल विश्वास निर्माण झाला तरच नवे उद्योग राज्यात मोठ्या प्रमाणात येतील. त्यासाठी देखील अशा कायद्याची गरज होती.

गेल्या काही वर्षांमध्ये बाह्यशक्तींच्या साहाय्याने अराजक निर्माण करून राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान देण्याचा, लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सरकारांना कामच न करू देण्याचा, त्यासाठी समाजमनात विषपेरणी करण्याचा एक घातक प्रवाह रुढ होत चालला आहे. लोकशाहीला आव्हान देणाऱ्या, प्रस्थापित कायदे यंत्रणेला धाब्यावर बसवून अराजक पसरवणाऱ्या, समाजात सुनियोजित पद्धतीने विखारी अपप्रचार करुन सरकारविरोधात कट रचणाऱ्या, शासकीय यंत्रणेला आव्हान देणाऱ्या बेकायदेशीर कृत्यांना लगाम घालण्यासाठी हा कायदा आणावा लागला आहे. तसेच अशा समाज विघातक घटकांना हाताशी धरुन आपल्या देशात गोंधळ निर्माण करण्यासाठी अमाप पैसा अवैध मार्गाने आपल्या देशात पेरणाऱ्या विदेशी शक्तींना आळा घालणे हा सुद्धा एक महत्वाचा उद्देश ह्या कायद्यामागे आहे.

सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, हा कायदा सरकारला स्वैर अधिकार देत नाही. राज्य सरकार या कायद्याचा वापर केवळ स्वतःच्या मर्जीने करू शकणार नाही. त्यावर सल्लागार मंडळाचे नियंत्रण असणार आहे. हे मंडळ उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश असलेल्या तज्ज्ञांनी बनलेले असेल. तीन महिन्यांच्या कालावधीत संपूर्ण परिस्थिती तपासून हे मंडळ अंतिम अहवाल देईल. या अहवालात मंडळाला बेकायदेशीर संघटनेचे घोषणापत्र, उद्दिष्टे, कृतींचा इतिहास, समर्थकांची भूमिका, निधीचे स्रोत व संभाव्य धोके यांचे मूल्यमापन करावे लागेल. म्हणजेच या कायद्याचा वापर करुन घेण्यात येणारा निर्णय केवळ भावनिक वा राजकीय हेतूंनी घेता येणार नाही. या कायद्यात संबंधितांना स्वतःची बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार व संधी दिलेली आहे.

हे सर्व मुद्दे लक्षात घेता राज्य सरकारने 'काळाची गरज' म्हणून हा कायदा केला असून तो लागू करताना लोकशाही तत्वांचे व कायद्याच्या चौकटीचे पूर्ण पालन केले आहे, हे स्पष्ट होते. ह्या कायद्यामुळे समाजविघातक कृत्ये करणाऱ्यांना पायबंद बसणार असून त्यांना विदेशातून मिळणारा बेहिशोबी पैसा बंद होणार आहे म्हणून ज्यांचे हितसंबंध दुखावले जात आहेत असे काहीजण ह्या कायद्याला विरोध करत आहेत. ■

# दरवाढ नव्हे दरकपात – वीज ग्राहकांना सुखद धक्का

● विश्वास पाठक

> महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण एकूण घरगुती ग्राहकांमध्ये ७० टक्के आहे. शंभर युनिटपर्यंतच्या वीजदरात यंदा दहा टक्के कपात झाली आणि आगामी पाच वर्षात अधिक कपात होऊन २६ टक्के वीजदर कपात होईल. महिना शंभर ते तीनशे युनिट वीज वापरासाठीच्या दरात पाच वर्षात पाच टक्के, तीनशे ते पाचशे युनिट वीज वापरासाठी ८ टक्के तर पाचशेपेक्षा अधिक वीजवापरासाठी ४ टक्के दरात घट होणार आहे. या ग्राहकांना चालू वर्षापासूनच टप्प्याटप्प्याने वीजदरात कपात होत जाईल.



**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य आहे. अशक्य वाटणारी विकासकामे त्यांनी करून दाखविली आहेत. मुंबई–नागपूर समृद्धी महामार्ग हा ७०० किलोमीटरचा एक्सप्रेस–वे ही मा. देवेंद्रजींच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. असंख्य अडचणी व आव्हानांवर मात करत त्यांनी हा प्रकल्प पूर्ण केला. या महामार्गावरून प्रवास करताना वाटते की, आपण युरोप किंवा अमेरिकेतील एक्सप्रेस महामार्गावरून जात आहोत. मुंबईच्या २२ किलोमीटर लांबीच्या अटल सेतू या समुद्री पुलाचीही तशीच गोष्ट आहे. अनेक दशकांपूर्वी शिवडी ते न्हावा शेवा जोडणाऱ्या या समुद्री पुलाची संकल्पना मांडली गेली होती. मा. देवेंद्रजी मुख्यमंत्री झाल्यावर या कामाला सुरुवात झाली आणि त्यांच्या नेतृत्वात हा पूल पूर्ण झाला. मुंबईच्या कोस्टल रोडचीही तीच कहाणी आहे. मा. देवेंद्रजींनी २०१४ साली मुख्यमंत्री होण्यापूर्वी भाजपा प्रदेशाध्यक्ष म्हणून आपल्या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये ही संकल्पना मांडली होती. त्यांच्याच नेतृत्वात मरीन ड्राईव्ह ते बांद्रा हा कोस्टल रोड टप्पा पूर्ण झाला आहे. यामध्ये समुद्राखालून जाणाऱ्या सुमारे चार किलोमीटर लांबीच्या बोगद्यांचा समावेश आहे. कोस्टल रोडवरून जाताना मुंबईचे जे दृश्य दिसते ते पाहून आपण न्यूयॉर्कमध्ये आहोत असे वाटेल. सध्या वर्सोवापर्यंतच्या कोस्टल रोडचेही काम चालू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कार्यपद्धती अनुसरली आहे. मोठी स्वप्ने पाहा आणि कठोर परीश्रम करून ती साकारा. ही सर्व कामे सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी असली पाहिजेत याची काळजी घ्या. केलेली विकासकामे पुढे अनेक वर्षे उपयोगी पडणारी असतील याचीही दक्षता घ्या. हा मोदींचा मार्ग आहे. मा. देवेंद्रजींनी त्या पद्धतीने अनेक मोठी कामे केली. समृद्धी महामार्ग, अटल सेतू, कोस्टल रोड ही तीन उदाहरणे आहेत. काँग्रेसचे अनेक मुख्यमंत्री झाले, काँग्रेस

राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार पंधरा वर्षे सत्तेवरही होते. पण कोणालाही जमले नाही असे काम मा. देवेंद्रजींनी करून दाखविले ते म्हणजे मराठा समाजाला आरक्षण दिले. पायाभूत सुविधांचा विकास असो किंवा सामाजिक न्यायासाठी मोठे निर्णय घेणे असो, मा. देवेंद्रजींनी अद्भूत आणि अशक्य वाटणारी कामे करून दाखविली आहेत. अशा प्रकारचे एक ऐतिहासिक काम त्यांच्या नेतृत्वात नुकतेच झाले आहे, ते म्हणजे राज्यातील विजेचे दर कमी करणे! होय, यावेळी विजेची दरवाढ होण्याच्या ऐवजी दरकपात झाली आहे. राज्यातील वीज ग्राहकांना हा सुखद धक्का आहे.

मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यभर विजेचा पुरवठा करणाऱ्या महावितरण (पूर्वीची एमएसईबी) या सरकारी कंपनीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर बहुवार्षिक वीजदर याचिका दाखल केली की, आम्हाला पुढच्या पाच वर्षांसाठी वीजदर कपात करू द्या. कायद्यानुसार आयोगाला विजेचा दर ठरविण्याचा अधिकार असतो. आयोगाने आदेश दिला असून घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी अशा सर्व ग्राहकांसाठीच्या वीजदरात कपात करण्याचा निर्णय झाला आहे. आगामी पाचही वर्षे वीजदर आणखी कमी होत जाणार आहेत. महावितरणने वीजदरवाढ न करता पाचही वर्षे सध्याचेच दर कायम ठेवले असते तरीही ग्राहकांना ही सवलतच ठरली असती. प्रत्यक्षात वीजदर कमी झाले आहेत. असे प्रथमच घडले आहे. नवे वीजदर १ जुलैपासून लागू झाले.

### घरगुती वीज ग्राहकांना दिलासा

घरगुती ग्राहकांसाठी वापरानुसार वेगवेगळे वीजदर असले तरी त्यांच्यासाठी टेलिस्कोपिक बिलिंग पद्धतीचा वापर होतो. एखाद्या ग्राहकाचा महिन्याचा विजेचा वापर १७५ युनिट असेल तर पहिल्या शंभर युनिटसाठी त्या वर्गवारीचा सवलतीचा दर लागू होईल व ७५ युनिटसाठी शंभर ते तीनशे युनिटचा वीजदर लागू होईल. त्यामुळे शंभर युनिटपर्यंत मोठी सवलत मिळाल्याचा लाभ त्यापेक्षा जास्त वीज वापरणाऱ्या मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय ग्राहकांनाही होणार आहे.

घरगुती वीज ग्राहकांना आणखी सवलत मिळाली आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत म्हणजे सौर ऊर्जा काळात वापरलेल्या विजेसाठी प्रति युनिट ८० पैसे अतिरिक्त सवलत मिळेल. दरवर्षी ही सवलत प्रति युनिट पाच पैसे वाढत जाईल व पाचव्या वर्षी प्रती युनिट १ रुपया असेल. या सवलतीसाठी टीओडी मीटर अथवा स्मार्ट मीटर आवश्यक आहे. महावितरणतर्फे मोफत स्मार्ट मीटर देण्यात येत आहेत.

इस्त्री, वॉशिंग मशिन, मिक्सर, ओव्हन ही घरातली उपकरणे अधिक वीज वापरतात. त्यांचा वापर सकाळी ९ ते सायंकाळी पाच या वेळेत केल्यास टीओडी सवलतीचा प्रभावी लाभ मिळेल. उन्हाळ्यात दिवसा एसी, पंखे, कुलर यांचा वापर वाढतो. त्यावेळीही टीओडी सवलतीमुळे बिलात घट होईल.

### अर्थव्यवस्थेला चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची अर्थव्यवस्था पाच ट्रिलिअन डॉलर्सची करून जगात तिसऱ्या स्थानावर नेण्याचा निर्धार केला आहे. त्यानुसार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन (एक हजार अब्ज) डॉलर्सची करण्याचे ध्येय मा. देवेंद्रजींनी निश्चित केले आहे. सध्या राज्याची अर्थव्यवस्था ५०० अब्ज डॉलर्सची आहे. उद्योगधंदे, व्यापार, हॉटेलसारखे सेवा क्षेत्र, शेती अशा सर्व आर्थिक कामांसाठी वीज ही मूलभूत आहे. रास्त दरात पुरेसा वीज पुरवठा असल्याशिवाय उत्पादन होणार नाही. उद्योग, व्यावसायिक, कृषी या ग्राहकांच्याही वीजदरात कपात झाल्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

उच्चदाब उद्योगांसाठीचा सध्याचा सरासरी बिल दर प्रति युनिट १० रुपये ८८ पैसे आहे तो चालू आर्थिक वर्षात १० रुपये ७८ पैसे प्रति युनिट करण्यात आला आहे. पुढील पाच वर्षे औद्योगिक वीजदर सातत्याने घटत जाईल व २०२९-३० या आर्थिक वर्षात तो ९ रुपये ९७ पैसे प्रति युनिट होईल. उच्चदाब औद्योगिक वीज दरात ८ टक्के घट होईल. लघुदाब औद्योगिक वीजदरही सध्याच्या १० रुपये २४ पैसे प्रति युनिटवरून कमी होत जाईल व आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये ९ रुपये ९० पैसे प्रती युनिट होईल. घरगुती ग्राहकांप्रमाणे औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांनाही सौर ऊर्जा कालावधीत वीजदरात अधिक सवलत देण्यात आली आहे. बहुतांश उदयोगांचे काम सकाळी ९ ते सायंकाळी ५ या मुख्य पाळीत चालते. या कालावधीतील वीज वापराला एप्रिल ते सप्टेंबर या

कालावधीसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या कालावधीसाठी २५ टक्के अतिरिक्त सवलत देण्यात आली आहे. राज्य शासनाने विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र तसेच डी व डी प्लस क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना यापूर्वीच वीजदरात अतिरिक्त सवलत लागू केली आहे. स्थिर, कार्यक्षमतेवर आधारित, टीओडी आणि नवीन अथवा विस्तारित उद्योगांना सवलत अशा विविध सवलती राज्य सरकारने दिल्या आहेत. विदर्भ मराठवाड्यातील उद्योगांसाठी राज्य शासनाने विद्युत कर (इलेक्ट्रिसिटी ड्युटी) माफ केला आहे. या सवलती आणि कमी झालेले वीजदर यामुळे आता महाराष्ट्रात उद्योगांचे वीजदर इतर औद्योगिक राज्यांच्या स्पर्धेत असतील.

उद्योगांप्रमाणेच व्यावसायिकांच्या वीजदरात चालू वर्षापासूनच पाच वर्षे सातत्याने कपात होणार आहे. उच्चदाब व्यावसायिक ग्राहकांच्या वीजदरात पाच वर्षाअखेरीस सहा टक्के कपात होईल. शेतकऱ्यांसाठीच्या वीजदरातही कपात करण्यात आली आहे. सध्याचा कृषीचा वीजदर ५ रुपये ३६ पैसे प्रती युनिट आहे तो पाच वर्षात कमी होऊन ३ रुपये ८३ पैसे प्रती युनिट या पातळीवर पोहोचेल. असे असले तरी, शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केली असून त्या अंतर्गत साडेसात एचपीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज मिळते. राज्यातील ४५ लाख शेतकरी मोफत विजेचे लाभधारक आहेत, याची नोंद घ्यायला हवी.

### दरवाढ कशी रोखली?

पारंपरिक पद्धतीने दरवेळी विजेची दरवाढ होत असे. महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीचा सध्याचा दर ८.१४ रुपये प्रती युनिट आहे, तो पारंपरिक पद्धतीने पाच वर्षात ११.३२ रुपये प्रती युनिटवर पोहोचला असता पण तो आता ६ रुपये प्रति युनिटपर्यंत खाली येईल. महिना शंभर ते तीनशे युनिटपर्यंत वीज वापणाऱ्या ग्राहकांसाठीचा सध्याचा दर १३.२३ रुपये प्रती युनिट आहे तो पारंपरिक पद्धतीने पाच वर्षात २२ रुपये ३४ पैसे प्रती युनिट या पातळीवर पोहोचला असता. पण हा दर आता पाच वर्षात १२ रुपये ६२ पैसे या पातळीवर घसरलेला असेल.

राज्यातील औद्योगिक ग्राहकांसाठीचा सध्याचा वीजदर १० रुपये ८८ पैसे प्रती युनिट आहे हा दर पारंपरिक पद्धती चालू राहिली असती तर पाच वर्षात १५ रुपये ७७ पैसे या पातळीवर पोहोचला असता पण उद्योगांचा वीज दर पाच वर्षात ९ रुपये ९७ पैसे या पातळीवर कमी झालेला असेल. व्यावसायिक ग्राहकांसाठीचा दरही सध्याच्या १६.९७ रुपये प्रति युनिटवरून पाच वर्षात २३.९१ रुपये प्रती युनिट दरावर पोहोचला असता पण आता तो १५.८७ रुपये असेल. परंपरेनुसार विजेचे दर वाढण्याच्या ऐवजी त्यात कपात होण्यास मा. देवेंद्रजींचे नेतृत्व कारणीभूत आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून राज्याच्या ऊर्जा विभागाची जबाबदारी घेतल्यापासून म्हणजे ३० जून २०२२ पासून राज्यात ऊर्जा परिवर्तन चालू आहे. यामध्ये नवीकरणीय उर्जेवर म्हणजे रिन्युएबल एनर्जीवर भर देण्यात आला आहे. ही वीज स्वस्त असल्याने ग्राहकांच्या वीजदरात कपात करणे शक्य झाले.

राज्याला आगामी काळात किती विजेची गरज पडेल हे ध्यानात घेऊन महावितरणने गेल्या दोन वर्षात ४५ हजार मेगावॅट वीज खरेदीचे करार केले. त्यामध्ये सौर, पवन, बॅटरी स्टोरेज, पंप स्टोरेज अशा नवीकरणीय ऊर्जेचा वाटा ३६ हजार मेगावॅट आहे. महावितरणला नवीकरणीय वीज स्वस्तात मिळेल. आगामी पाच वर्षात महावितरणचे वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचतील. महावितरणच्या महसुलातील ८५ टक्के निधी वीज खरेदी आणि विजेचे उपकेंद्रापर्यंत वहन करण्यासाठी खर्च होतो. खरेदी खर्चात मोठी बचत झाल्यामुळे महावितरणने वीजदर कपातीचा निर्णय घेतला. वीजखरेदीचे नियोजन आणि वीजदर कपात यामध्ये महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र व त्यांच्या टीमने मा. देवेंद्रजींच्या नेतृत्वात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक अवघड आणि अशक्य वाटणारे प्रकल्प साकारले आहेत. राज्यातील वीजदर कमी करणे ही सुद्धा तशीच एक कामगिरी आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्याची पाणी समस्या कायमची संपविण्यासाठी मराठवाडा वॉटरग्रीडचे काम आरंभले आहे, त्यांनी राज्यातील महत्त्वाची तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाचे काम हाती घेतले आहे, त्यांनी पाच वर्षात राज्याची अर्थव्यवस्था दुप्पट करण्याचे काम सुरू केले आहे. वीजदर कपातीप्रमाणे ही कामेही ते पूर्ण करून दाखवतील असा मला विश्वास आहे.

**(श्री. पाठक हे महावितरणचे स्वतंत्र संचालक आहेत.)**

# ब्रिटन बरोबरच्या मुक्त व्यापार करारामुळे काय फायदे होणार?



ब्रिटनसोबतचा मुक्त व्यापार करार (Free Trade Deal) अखेर पूर्ण झाला. डेव्हिड केमरनच्या काळापासून तो रखडला होता; त्यांनी तर दिवाळीचा दिवसही निश्चित केला होता. पण ब्रेक्झिटमुळे त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर ब्रिटनमध्ये ५ पंतप्रधान आले, पण हा करार होऊ शकला नाही.

**ब्रिटनसोबत** भारताचा व्यापार ५० अब्ज डॉलरचा आहे, पण मुक्त व्यापार करारानंतर तो १५० अब्ज डॉलरपर्यंत जाऊ शकतो. यामुळे ब्रिटन चीननंतर भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार बनेल. अमेरिकेचे शुल्क (tariffs) लागण्यापूर्वी हे सर्व होणे आवश्यक होते; ऑस्ट्रेलिया आणि यूएईसोबत तर ते आधीच झाले आहे. आता फक्त एका ठिकाणी थोडे लक्ष देण्याची गरज आहे आणि कदाचित दिलेही जात आहे, पण फळ मिळायला वेळ लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे मालदीव अखेर वठणीवर आला. मुईज़्ज़ू 'इंडिया आऊट'च्या घोषणेने सत्तेत आले होते, पण जेव्हा त्यांनी मंत्रालयात पाहिले की, येथील टेबल्ससुद्धा भारतातूनच बनवून येतात, तेव्हा त्यांना फक्त १ वर्ष लागले आणि ते वठणीवर आले. भारताने ५ हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले, हेही चांगले झाले, कारण ही रक्कम खूप मोठी नाही. ती १ अब्ज डॉलरही नाही. या छोट्या देशांकडे लक्ष दिले नाही, तर ते चीनकडून कर्ज घेऊन आपली बंदरे त्यांना सोपवतात आणि भारतासाठी चिंता वाढते म्हणून मालदीवला भारतावर अवलंबून ठेवण्याच्या दृष्टीने हे योग्य आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा करार केवळ आर्थिक भागीदारी नसून सामायिक समृद्धीची योजना आहे. भारतीय कापड, पादत्राणं, रत्नं आणि दागिने, समुद्री खाद्यं आणि अभियांत्रिकी उत्पादनांना ब्रिटनमध्ये चांगली मागणी मिळेल. भारताच्या कृषी उत्पादनांसाठी आणि प्रक्रिया केलेल्या अन्न उद्योगासाठी ब्रिटिश बाजारपेठेत चांगल्या संधी उपलब्ध होतील.



हा करार भारतातील शेतकरी, मच्छीमार आणि एमएसएमई क्षेत्रासाठी विशेष फायदेशीर ठरेल. वैद्यकीय उपकरणं आणि एरोस्पेस पार्ट्स यांसारखी यूकेमध्ये बनवलेली उत्पादनं भारतातील लोकांना आणि उद्योगांना सहज आणि स्वस्त दरात उपलब्ध असतील, असंही त्यांनी म्हटलं आहे. ब्रिटन त्याच्या एकूण निर्यातीपैकी १.९ टक्के निर्यात ही भारतासोबत करतो तर त्याच्या एकूण आयातीपैकी १.८ टक्के आयात भारताकडून करतो. या करारानुसार, भारतातून युकेला (UK) जाणाऱ्या नव्व्याण्णव टक्के उत्पादनांवर कोणताही कर लागणार नाही. तर, युकेमधून (UK) भारतात येणाऱ्या नव्वद टक्के वस्तूंवरील कर कमी होणार आहे. यामुळे भारतीयांना मोठा फायदा होणार असून, केवळ व्यावसायिकांनाच नव्हे तर सर्वसामान्यांनाही दिलासा मिळाला आहे. ब्रिटनमधून (Britain) येणारे मोबाईल (Mobile), लॅपटॉप (Laptop), शूज (Shoes), दागिने (Jewelry) आणि फॅशनच्या (Fashion) वस्तू स्वस्त होण्याची शक्यता आहे. भारतात बनवलेल्या इलेक्ट्रिक गाड्यांनाही (Electric Cars) ब्रिटनमध्ये (Britain) कर लागणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत निर्यात १ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढवण्याचं महत्त्वाकांक्षी ध्येय ठेवलं आहे आणि यासाठी ब्रिटन हा सर्वोच्च प्राधान्य असलेला व्यापारी भागिदार आहे. यूकेमधून निर्यात होणाऱ्या वस्तूंवरील सरासरी शुल्क १५% वरून ३% पर्यंत कमी होईल, यामुळे ब्रिटिश कंपन्यांसाठी भारतात विक्री करणं सोपं होईल.

■ भारतानं ब्रिटनमधून आयात होणाऱ्या व्हिस्कीवरील कर १५०% वरून ७५% पर्यंत म्हणजे निम्म्यानं कमी केला आहे.

■ मोबाईल, लॅपटॉप आणि गॅझेट्स: इलेक्ट्रॉनिक उत्पादनांवरील कर कमी झाल्यामुळे या वस्तू स्वस्त होऊ शकतात.

■ शूज, कपडे आणि फॅशन उत्पादने: आता यावर शून्य कर असेल किंवा खूप कमी कर असेल, ज्यामुळे बाजारात त्यांच्या किमती कमी होऊ शकतात.

■ दागिने: यूकेमधून येणाऱ्या दागिन्यांवरील कस्टम ड्युटीमध्ये कपात केल्याने त्यांच्या किमतीही कमी होऊ शकतात.

■ चामड्याची उत्पादनं: चामड्याचे जॅकेट, बॅग्ज आणि शूज यासारख्या वस्तू आता परवडणाऱ्या किमतीत मिळू शकतात.

### औषधांच्या किमतींवर संमिश्र परिणाम

भारत आणि ब्रिटनमध्ये औषधांचा व्यापार दुतर्फा आहे. भारत ब्रिटनला औषधे निर्यात करतो आणि तेथून काही औषधं आयातही करतो. त्यामुळे, एफटीएनंतर काही औषधांच्या किमती कमी होऊ शकतात, परंतु काही प्रकरणांमध्ये ती महाग देखील होऊ शकतात. याचा थेट परिणाम दोन्ही देश कोणत्या औषधावरील किती शुल्क कमी करतात यावर होईल. ■

# आरोग्य सेवेचा चेहरामोहरा बदलणारी 11 वर्षे

● जे.पी.नड्डा, राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय आरोग्य मंत्री

> देशातील आरोग्य सेवा क्षेत्रात गेल्या ११ वर्षात पूर्णत: परिवर्तन घडले आहे. कष्टकरी, गोरगरीब, वंचित माणूस डोळ्यापुढे ठेवून आरोग्य क्षेत्रात गेल्या ११ वर्षात अनेक योजना सुरू करण्यात आल्या. गरजू वर्गासाठी सुरू करण्यात आलेल्या 'आयुष्मान भारत' योजनेने अनेक सामान्य नागरिकांना मदतीचा हात मिळाला आहे.






**देशात** वैद्यकीय महाविद्यालयातील जागांची संख्या वाढल्यामुळे तसेच वैद्यकीय महाविद्यालयांची संख्याही वाढल्यामुळे प्रशिक्षित डॉक्टर वर्गाची उपलब्धता वाढली आहे. ५ वर्षापूर्वी कोरोना संकटाच्या काळात आरोग्य क्षेत्राने मोलाची कामगिरी बजावली. त्या काळात आरोग्य सेवेतील अनेक त्रुटी दूर करण्यात आल्या. कोरोनावरील लस दुर्गम भागात वेळेवर पोहचवण्यात आपल्या यंत्रणेला यश आले. भारतातील कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिम ही जगातील सर्वात मोठी मोहिम ठरली. को-विन या ॲपद्वारे लसीकरण अभियान डिजीटल पद्धतीने राबवण्यात आले. अनेक प्रगत देशांनाही अशा पद्धतीने लसीकरण मोहिम राबविता आली नाही. अल्पकाळात कोरोनावरील प्रतिबंधक लसीचे २.२ अब्जपेक्षा अधिक डोस या लसीकरण मोहिमेत देण्यात आले. या क्षेत्राला लागणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधांची युद्ध पातळीवर पूर्तता करण्यात आली. कोरोना काळात सरकारी रुग्णालयातील ऑक्सिजन खाटांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली. गोरगरिबांना पडवणाऱ्या दरात औषधे पुरवण्यासाठी जनऔषधी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. देशभरात १६ हजारांपेक्षा अधिक जनऔषधी केंद्रे सुरू झाली आहेत. अन्य दुकानापेक्षा ५० ते ९० टक्के कमी किमतीत औषधे देणाऱ्या जनऔषधी केंद्रांमुळे गरीब आणि गरजूंची ३८ हजार कोटी रुपयांची बचत झाली आहे. विविध आजारांना प्रतिबंध करण्यासाठी 'मिशन इंद्रधनुष'मध्ये १.३२ कोटी गर्भवती महिलांचे आणि ५.४७ कोटी मुलांचे १२ आजारांवर लसीकरण करण्यात आले. 'पंतप्रधान मातृ वंदना' योजनेत सुमारे ४ कोटी महिलांना आणि स्तनदा मातांना १९ हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे. ५ लाख रुपयापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत देणाऱ्या 'आयुष्मान भारत' योजनेचा फायदा सुमारे १० कोटी लोकांनी घेतला आहे.






बाल मृत्यू व आजारांची संख्या कमी करण्यासाठी मिशन इंद्रधनुषअंतर्गत ६.७८ कोटीहून अधिक महिला आणि बालकांना वैद्यकीय कवच देण्यात आले आहे. या योजनेत २ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांचे आणि गर्भवती महिलांचे लसीकरण केले जाते.



७८ कोटी ३९ लाख ८० हजार लोकांची आभा कार्ड तयार करण्यात आली.

विविध आजारांची चाचणी करणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या (टेस्टींग लॅब) मार्च २०२० मध्ये म्हणजे कोरोना सुरू झाला त्यावेळी अवघी १४ होती. आता ती संख्या ३ हजार ४०० पर्यंत वाढवण्यात आली आहे. ऑक्सिजनचा पुरवठा करणाऱ्या बेडची संख्या मार्च २०२० मध्ये ५० हजार ५८३ होती आता ती संख्या ५.१५ लाख एवढी झाली आहे. म्हणजे ऑक्सिजन बेडच्या संख्येत १० पटीने वाढ झाली आहे. अतिदक्षता उपचार करणारे बेड मार्च २०२० मध्ये २ हजार १६८ एवढे होते. आता या बेडची संख्या १.४५ लाख एवढी वाढली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी 'आयुष्मान भारत वय वंदना' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी ५८ लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी नावनोंदणी केली आहे. ज्येष्ठ नागरिकांवर सुमारे ५०० कोटी रुपयांचे उपचार आजवर झाले आहेत. आयुर्विज्ञान संस्थाची संख्या (एम्स) २३ पर्यंत वाढली आहे. देशातील वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या २०४५ इतकी झाली आहे. गेल्या ११ वर्षात वैद्यकीय महाविद्यालयातील जागा १.१८ लाखाने वाढल्या आहेत. ई-संजीवनी हा टेलिमेडिसीन कार्यक्रम आरोग्य सेवेत क्रांती घडवणारा ठरला आहे. गरजूंना दूरध्वनीच्या माध्यमातून आरोग्य सेवा देणाऱ्या या योजनेचा फायदा ३२ कोटींहून अधिक नागरिकांनी घेतला आहे. ■

प्रदेश कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन तसेच 'एशिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस'तर्फे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा सन्मान उपस्थिती– एशिया बुक ऑफ रेकॉर्डसचे वरिष्ठ परीक्षक संजय भोला, सीमा मन्नीकोट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, राजेश पांडे, विजय चौधरी, मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, कार्यालय सह–सचिव भरत राऊत आदी.







सोलापूर– उपस्थिती– महेश दासी, ऋषिकेश चिलवेरी, नविन फुलपाटी, श्रीकांत येमुल, शाम कोटा, शुभम मिठ्ठा, तुषार कामुर्ती, बालाजी आंबट, किरण आंबट, दिनेश सुरा, दिपक बुधाराम, दिनेश श्रीकोंडा, अरूण आडम आदी.



ईश्वरपूर (जि.सांगली)– उपस्थिती– आ. सदाभाऊ खोत, राहुल महाडीक, सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडीक, माजी आमदार भगवान साळुंखे, प्रदेश सदस्य स्वरूप पाटील, अर्जुन साळुंखे, अमोल पडळकर, पै. जयकर कदम, संदीपराज पवार, सतीश महाडीक, एल.एन शहा, चेतन शिंदे, सुजित थोरात, आबासाहेब पवार, अजिंक्य कुंभार, अमोल ठाणेकर, सत्यवान रासकर, विशाल शिंदे, जलाल मुल्ला मन्सूर मोमीन, शीतल कराडे, अनिता ओसवाल, करिष्मा जाधव, तेजस्विनी पाटील, तहसीन अत्तार आदी.



नागपूर- उपस्थिती- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सुलेखा कुंभारे, नागपूर जिल्हा सरचिटणीस अनिल निधान, कामठी शहराध्यक्ष मंगेश यादव, अजय कदम, वंदना भगत, राज हाडोंती, कपिल गायधने, चंद्रशेखर तुप्पट, राजेश खंडेलवाल, दीपंकर गणवीर, उज्वल रायबोले, राजेश देशमुख आदी.



कोल्हापूर- उपस्थिती- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आ.अमल महाडिक, जिल्हाध्यक्ष विजय जाधव, प्रदेश सचिव महेश जाधव आदी.

नवी मुंबई- उपस्थिती- प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, राजकुमार पाटील, प्रशांत कदम, हैप्पी सिंग, संजय पाटील आदी.





नाशिक- उपस्थिती- जिल्हाध्यक्ष सुनिल केदार, आ.राहुल ढिकले, माजी आ.बाळासाहेब सानप, ज्येष्ठ नेते विजयराव साने, मंडल अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, महेश महंकाळे, युवराज झोमान, दिगंबर धुमाळ, पूनम सोनवणे, सुरेश खेताडे, रुची कुंभारकर, धनंजय पुजारी आदी.



सातारा- उपस्थिती- प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, प्रदेश सचिव भरत पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य हिंदुराव पाटील, दीपक महाडिक, मंडल अध्यक्ष गणेश यादव, ग्रामपंचायत सदस्य सुरेश पाटील, श्रीराम म्हात्रे, पोपटराव खेडेकर आदी.



पिंपरी-चिंचवड- उपस्थिती- आ. शंकर जगताप, सुरेश नढे, विनोद तापकीर, आकाश भारती, कैलास सानप, रमेश काळे, पंकज मिश्रा, प्रमोद येवले, अश्विनी बापट, अतुल नढे, सचिन काळे आदी.



बारामती- उपस्थिती- चंद्रराव तावरे, अविनाश मोटे, रंजन तावरे, गोविंद देवकाते, प्रमोद खराडे, राजेश कांबळे, सतीश फाळके, श्याम कोकरे, सागर चिंचकर, संदीप बनकर, रोहित शिंदे, चंद्रकांत केंगार, हिरामण लोंढे, सुनील गायकवाड, संजय गिरमे, पिंकी मोरे, सविता पवार, संतोष जाधव आदी.

## रक्तदान शिबिर



काळाचौकी (मुंबई)– उपस्थिती– महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष आ. चित्रा वाघ, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष शलाका साळवी, शिवडी विधानसभा अध्यक्ष गणेश शिंदे, पार्थ बावकर, सचिन भोसले, अनिकेत पवार, दीपिका चिपळूणकर, रिया बावकर, डॉ. सरिता पाटील, डॉ. प्रागजी वाझा, डॉ. वैशाली शेलार आदी.



सांगली– उपस्थिती– आ. सुधीरदादा गाडगीळ, जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, माजी आमदार दिनकर पाटील, राज्य परिषद सदस्य प्रकाश बिरजे, जिल्हा सरचिटणीस राजू आवटी, विश्वजीत पाटील, जिल्हा उपाध्यक्ष शैलेश पवार, मंडल अध्यक्ष रवींद्र वादवणे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अविनाश मोहिते, जिल्हा सचिव उदय मुळे, राजेंद्र कुंभार, भारती दिगडे, उर्मिला बेलवलकर आदी.



परभणी– उपस्थिती– मंडळाध्यक्ष स्वप्नील पिंगळकर, सुनील देशमुख, मंगल मुदगलकर, मोहन कुलकर्णी, बाळासाहेब जाधव, प्रदीप तांदळे, दिनेश नरवाडकर, डॉ. अशोक शेलगावकर, डॉ. नरेंद्र ब्रह्मपुरीकर, सुप्रिया मांडे, अर्चना जैन, योगेश जोशी सोनपेठकर, विश्वास कराळे पाटील, रोहित जगदाळे आदी.




जळकोट (जि.लातूर)– उपस्थिती– राहुल भैया केंद्रे, मंडळ अध्यक्ष सत्यवान पांडे आदी.




धुळे– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी तालुकाध्यक्ष किशोर माळी, कृउबा समिती माजी सभापती नरेंद्र सिसोदिया, उपसरपंच योगेंद्रसिंग राजपुत, ग्रामीण युवा मोर्चा अध्यक्ष संदीप कुवर, सरचिटणीस अजिंक्य शिरसाठ, गणेश कोळी, रोहित माळी आदी.



मुंबई येथे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'साठी २० लाखांचा धनादेश सुपूर्द केला.




गडचिरोली- 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'साठी आ. करण देवतळे यांनी २ लाख २२ हजार २२२ रु. चा धनादेश सुपूर्द केला.




पंढरपूर- 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'साठी किसान मोर्चाचे संदीप गिड्डे-पाटील यांनी ५ लाख ५५ हजार ५५५ रु.चा धनादेश सुपूर्द केला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.समाधान अवताडे, आ.गोपीचंद पडळकर आदी.




गडचिरोली- 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'साठी आ.डॉ.मिलींद नरोटे यांनी २ लाख ५१ हजाराचा धनादेश सुपूर्द केला.

# मोदी सरकारच्या काळातील पायाभूत सुविधांचा विकास

● अविनाश देव

विकसित भारताच्या दिशेने टाकलेले निर्णायक पाऊल म्हणजे भारताच्या पायाभूत सुविधांचा वेगाने विकास. विकसित राष्ट्र असलेल्या देशाकडे मजबूत पायाभूत सुविधा आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी म्हणाले होते, अमेरिका श्रीमंत आहे कारण अमेरिकन रस्ते चांगले आहेत.

**पंतप्रधान** मोदीजींच्या मार्गदर्शनाखाली नितीन गडकरीजींनी देशात अनेक नवीन महामार्ग बांधले आहेत, तर देवेंद्र फडणवीस यांनीही महाराष्ट्रात नवीन महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकसित केल्या आहेत– रेल्वे बजेटमध्ये वाढ: मोदी सरकारने रेल्वे बजेटमध्ये ९ पट वाढ केली आहे.

● **नवीन विमानतळ :** २०१४ नंतर देशात ८६ नवीन विमानतळ बांधण्यात आले आहेत.

● **राष्ट्रीय महामार्गांचा विकास :** २०१४ पासून ३९६००० किमी रस्ते बांधण्यात आले आहेत.

● **मेट्रोचा विस्तार :** २०१४ मध्ये २५० किमीवरून आता ११५० किमी पर्यंत वाढ झाली आहे.

### महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा विकास

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र सरकारच्या सहभागाने मेट्रो, महामार्ग, रिंग रोड, बुलेट ट्रेन, सागर सेतू, अटल सेतू कोस्टल रोड, मुंबई नवीन विमानतळ, वाढवन नवीन बंदर ही कामे सुरू केली आहेत.

● **विकासाचा वेग:** देशात मोटार वाहन, रेल्वे आणि



हवाई वाहतुकीचा वेग वाढला आहे, ज्यामुळे भारतीय नागरिकही वेगाने पुढे जात आहेत.

● **उद्योग आणि व्यवसाय :** या वेगाचा फायदा उद्योग आणि व्यवसायांना मिळत आहे.

● **जलयुक्त शिवार योजना :** ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने सुरू केलेली एक महत्त्वाकांक्षी योजना आहे, ज्याचा उद्देश राज्यात पाणी साठवण आणि सिंचन सुविधा वाढवणे आहे. जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत, राज्यातील ३९ लाख हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आली आहे, ज्यामुळे सुमारे २७ टीएमसी पाणी साठवले गेले आहे. आदरणीय देवेंद्रजींच्या स्वप्नातील वनगंगा ते नळगंगा नदी जोडणी प्रकल्पांतर्गत काम सुरू झाले आहे. विदर्भातील शेतकर्यांसाठी हे वरदान आहे....! विकसित भारताच्या दिशेने पायाभूत सुविधांचा विकास खूप महत्त्वाचा आहे. आदरणीय मोदीजींच्या सरकार आणि आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या महाराष्ट्र सरकारच्या प्रयत्नांमुळे, देशाच्या आणि राज्यातील पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. २०४७ पर्यंत महाराष्ट्राला विकसित राज्य बनवण्यासाठी सरकार २०४७ काम करत आहे.

**(श्री. देव हे वर्धा जिल्हा सरचिटणीस आहेत.)**

# डिजिटल इंडियाचे एक दशक

● नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> १० वर्षांपूर्वी आपण एक अशक्य वाटणारे स्वप्न पाहिले. भारताला डिजिटल महासत्ता बनवण्याचे! हे केवळ तंत्रज्ञानाचे स्वप्न नव्हते, तर ही एक दूरदृष्टी होती. एक विचार होता, की भारताचा प्रत्येक नागरीक, मग तो कुठेही का असेना, तंत्रज्ञान आत्मसात करून सबळ बनू शकतो. आज डिजिटल इंडिया ही एक चळवळ बनली आहे. ही एक अशी क्रांती आहे जी विचारांपासून प्रणालींपर्यंत आणि गावांपासून जागतिक स्तरापर्यंत भारताला नवीन शिखरावर नेत आहे.

**१०** वर्षांपूर्वी, दृढ विश्वासाने आम्ही एका अज्ञात क्षेत्रात एक धाडसी प्रवास सुरू केला. भारतीय नागरिक तंत्रज्ञान वापरू शकतील का याबाबत दशका नु दशके, सतत शंका घेतली जात होती. आम्ही ही विचारसरणी बदलली. भारतीय नागरिकांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करण्याची क्षमता आहे, यावर विश्वास ठेवला. ज्यांना पूर्वी वाटायचे की तंत्रज्ञानामुळे श्रीमंत आणि गरिबांमधील दरी अधिक वाढेल, त्यांच्याही मानसिकतेत आम्ही परिवर्तन घडवून आणले. आम्ही तंत्रज्ञानाचा उपयोग ही दरी मिटवण्यासाठी केला.

जेव्हा हेतू शुद्ध असतो, तेव्हा नवोन्मेष दुर्बलांना सबळ बनवतो. जेव्हा विचार सर्वसमावेशक असतो, तेव्हा तंत्रज्ञान, समाजात दुर्लक्षित, दुर्बल किंवा मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवते. याच विश्वासाने, 'डिजिटल इंडिया' या मोहिमेचा पाया रचला आहे. डिजिटल इंडिया म्हणजे सर्वांपर्यंत पोहोचणाऱ्या सेवा, सर्वसमावेशक डिजिटल पायाभूत सुविधा आणि प्रत्येकासाठी संधी निर्माण करण्याचा घेतलेला एक वसा आहे. २०१४ पूर्वी, इंटरनेटचा प्रसार मर्यादित होता, १४० कोटी भारतीयांच्या जीवनातही आहे. आपण शिकतो कसे, व्यवहार करतो कसे आणि निर्माण करतो कसे, या प्रत्येक टप्प्यावर आज डिजिटल इंडियाचे अस्तित्व आहे.

> **आज देशात ४२ लाख किलोमीटररहून अधिक ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे, जी पृथ्वी आणि चंद्रामधील अंतराच्या ११ पट जास्त आहे.**

### डिजिटल दरी मिटवणे

भारतात २०१४ साली सुमारे २५ कोटी इंटरनेट कनेक्शन (आंतरजाल जोडण्या) होत्या. आज ही संख्या वाढून ९७ कोटींपेक्षा जास्त झाली आहे. देशभरात टाकलेली ४२ लाख किलोमीटरहून अधिक लांबीची, पृथ्वी आणि चंद्रामधील अंतराच्या ११ पट असलेली ऑप्टिकल फायबर केबल, आता सर्वात दुर्गम गावांनाही जोडते आहे. भारतात सुरु झालेली ५ जी सेवा जगातील



सर्वात वेगाने सुरू झालेली सेवा आहे. केवळ २ वर्षात ४.८१ लाख, दूरसंचार आधार केंद्र (बेस स्टेशन) उभारली गेली आहेत. आज जलदगती आंतरजाल (हाय-स्पीड इंटरनेट) फक्त शहरांपुरते मर्यादित न राहता, गलवान, सियाचिन, आणि लडाखमधील सीमावर्ती लष्करी ठाण्यांपर्यंत पोहोचले आहे. आपल्या डिजिटल पायाभूत रचनेचा आधारस्तंभ असलेल्या इंडिया स्टॅक या डिजिटल सार्वजनिक पायाभूत संरचनेने (Digital Public Infrastructure- DPI) यूपीआयसारखे आर्थिक व्यवहार मंच भक्कम केले आहेत. हा मंच आता दरवर्षी १०० अब्जांहून अधिकचा व्यवहार हाताळतो. सर्व वास्तविक वेळेतील डिजिटल व्यवहारांपैकी (एका खात्यातून दुसऱ्या खात्यात तात्काळ होणारे) जवळपास निम्मे व्यवहार भारतात होतात. प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) च्या माध्यमातून ४४ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम नागरिकांच्या खात्यांमध्ये थेट पाठवण्यात आली आहे. दलालांना हटवण्यात आल्यामुळे ३.४८ लाख कोटींची गळती टाळली गेली आहे. स्वामित्वसारख्या योजनांद्वारे २.४ कोटींपेक्षा अधिक मालमत्ता पत्रिका (Property Cards) जारी करण्यात आल्या आहेत आणि ६.४७ लाख गावांचे नकाशांकन (मॅपिंग- नकाशे काढून सर्वेक्षण) करण्यात आले आहे. यामुळे जमिनीशी संबंधित अनिश्चितता आणि वाद संपुष्टात आले आहेत.

**प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी)च्या माध्यमातून ४४ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम नागरिकांच्या खात्यांमध्ये थेट पाठवण्यात आली आहे. दलालांना हटवण्यात आल्यामुळे ३.४८ लाख कोटींची गळती टाळली गेली आहे.**

### सर्वांसाठी, संधींचे लोकशाहीकरण

भारताची डिजिटल अर्थव्यवस्था, आज एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) तसेच छोट्या उद्योजकांना पूर्वीपेक्षा अधिक सक्षम बनवत आहे. ONDC (Open Network for Digital Commerce अर्थात डिजिटल वाणिज्यासाठी खुले जाळे) हा एक क्रांतिकारक डिजिटल मंच आहे. हा मंच, खरेदीदार आणि विक्रेत्यांना एका विशाल डिजिटल बाजाराशी सहजपणे जोडून, व्यवसायासाठी नव्या संधींचे दरवाजे खुले करतो. Government e- Marketplace (GeM) अर्थात 'जेम'

या सरकारी इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेच्या माध्यमातून सामान्य नागरिकही सरकारच्या विविध खात्यांना वस्तू आणि सेवा पुरवू शकतो. हे मंच, केवळ सामान्य व्यक्तींना मोठ्या ग्राहकवर्गाशी जोडत नाहीत, तर सरकारचा पैसाही वाचवतात. कल्पना करा आपण मुद्रा कर्जासाठी ऑनलाईन अर्ज करत आहात. 'अकाउंट एग्रीगेटर फ्रेमवर्क'च्या माध्यमातून तुमची कर्जपात्रता (क्रेडिट योग्यता) तपासली जाते आणि तुम्हाला ऑनलाइन कर्ज मिळते. त्यानंतर तुम्ही तुमचा उद्योग सुरू करता, तुम्ही Gem (गव्हर्नमेंट ई–मार्केटप्लेस) वर नोंदणी करता, शाळा–रुग्णालये यांना वस्तू आणि सेवा पुरवता आणि नंतर ONDC च्या माध्यमातून देशभर व्यवसाय वाढवता. ONDC ने अलीकडेच २० कोटी व्यवहारांचा टप्पा पार केला आहे. त्यापैकी शेवटचे १० कोटी व्यवहार फक्त ६ महिन्यांत झाले आहेत. बनारसच्या विणकरांपासून नागालँडच्या बांबू कारागीरांपर्यंत, देशाच्या कानाकोपऱ्यातून विक्रेते आता, दलालांशिवाय, कोणत्याही डिजिटल मक्तेदारीशिवाय ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. GeM वर फक्त ५० दिवसांत १ लाख कोटींचा एकूण व्यवहार पूर्ण केला आहे. १.८ लाख महिला संचालीत एमएसएमईसह २२ लाखांहून अधिक विक्रेत्यांनी, एकूण ४६ हजार कोटी रुपयांची मागणी (ऑर्डर) पूर्ण केली आहे.

### डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा: भारताची जगाला देणगी

आधार, कोविन, डिजीलॉकर आणि फास्टॅगपासून ते पीएम–वाणी आणि एक राष्ट्र एक सदस्यत्व (वन नेशन वन सब्स्क्रिप्शन) पर्यंतच्या भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आता जगभर अभ्यासल्या आणि स्वीकारल्या जात आहेत. कोविन (CoWIN) प्रणालीने जगातील सर्वात मोठ्या लसीकरण मोहिमेस सक्षम केले, आणि २२० कोटी, क्यू आर कोडने पडताळण्याजोगी (QR - verificable) प्रमाणपत्रे जारी केली. ५४ कोटी वापरकर्ते असलेल्या डिजीलॉकर सुविधेमध्ये, ७७५ कोटींपेक्षा अधिक दस्तऐवज सुरक्षित आणि अखंडपणे संचयित केले जात आहेत. जी–२० अध्यक्षतेच्या काळात, भारताने डिजिटल माहितीचे जागतिक भांडार (Global DPI Repository) आणि २५ दशलक्ष डॉलर्सचा गरीब देशांना मदतीसाठी सामाजिक परिणाम निधी (Social Impact Fund) सुरु केला. यामुळे आफ्रिका आणि दक्षिण आशियातील देशांना समावेशक डिजिटल परिसंस्था स्वीकारण्यास मदत झाली.

स्टार्टअप शक्ती आणि आत्मनिर्भर भारत यांचा मिलाफ

भारत आता जगातील सर्वोत्तम ३ स्टार्टअप परिसंस्था पैकी एक आहे. या परिसंस्थेत १.८ लाखांहून अधिक स्टार्टअप्स आहेत. ही फक्त स्टार्टअप चळवळ नाही, तर हे एक तंत्रज्ञान क्षेत्रातील नवंजागरण आहे. तरुणाईमध्ये एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) कौशल्य विकसित करण्याबाबत भारत उत्तम प्रगती करत आहे. १.२ अब्ज डॉलर्सच्या इंडिया एआय मिशन अंतर्गत, भारताने ३४ हजारपर्यंत GPU (गणनायन यंत्रे), जागतिक स्तरावर १ डॉलर प्रति GPU प्रति तासापेक्षा कमी दराने उपलब्ध करून दिली आहेत. भारत आता फक्त इंटरनेट सेवा स्वस्त देणारा देश नाही राहिला, तर तो जगभरातील कंपन्यांना आणि संशोधकांना कमी किमतीत संगणकीय प्रक्रिया पुरवणारा एक मुख्य देश (केंद्र) बनत आहे. 'मानवतेसाठी एआय' या उपयोगाला, भारताने सर्वप्रथम पाठिंबा दिला. एआयवर आधारित 'नवी दिल्ली जाहीरनामा', जबाबदारीपूर्वक नवोन्मेषाला प्रोत्साहन देतो. देशभर एआय उत्कृष्टता केंद्रे (AI सेंटर फॉर एक्सलन्स) उभारली जात आहेत.

### पुढील वाटचाल

पुढील दशक आणखी परिवर्तनशील ठरणार आहे. भारत आता डिजिटल प्रशासनातून जागतिक डिजिटल नेतृत्वाच्या दिशेने, 'इंडिया फर्स्ट' पासून 'इंडिया फॉर द वर्ल्ड' (भारताला पहिले प्राधान्य यापासून जगासाठी भारत) या दिशेने वाटचाल करत आहे. डिजिटल इंडिया हा केवळ एक शासकीय कार्यक्रम न राहता, एक लोकचळवळ बनला आहे. तो आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी, आणि भारताला जगासाठी एक विश्वासार्ह नवोन्मेष भागीदार बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. सर्व नवोन्मेषक, उद्योजक आणि स्वप्न पाहणाऱ्यांसाठी संदेश: आज संपूर्ण जग पुढील डिजिटल यशासाठी भारताकडे पाहत आहे. चला, आपण असे काही निर्माण करूया जे सर्वांना सबळ करणारे ठरेल. चला, अशा समस्या सोडवूया, ज्या खऱ्या अर्थाने महत्त्वाच्या आहेत. चला, आपण असे तंत्रज्ञानाने परिपूर्ण नेतृत्व करूया जे सर्वांना जोडते, सर्वांना एकत्र आणते आणि सर्वांची प्रगती घडवते. ■

# शस्त्रास्त्र निर्मितीमध्ये भारत झाला आत्मनिर्भर



संरक्षण विषयक उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भरता मिळवण्यासाठी भारताने अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. धोरणात्मक सुधारणा करण्यात आल्या, संरक्षण उत्पादनामध्ये खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात आला, आणि या क्षैत्रात सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योग (एमएसएमई) तसेच नवंउद्योगांना (स्टार्टअप्स) प्रोत्साहन देण्यात आले. उत्तर प्रदेश आणि तमिळनाडूमध्ये डिफेन्स पॉडक्शन कॉरिडॉर अर्थात संरक्षण विषयक उत्पाढन क्षेत्राची स्थापना करण्यात आली.

**आज** आशियातील सर्वात मोठी हेलिकॉप्टर निर्मिती करणारा कारखाना, भारतात कार्यरत आहे. या सुधारणांचा परिणाम असा झाला आहे की गेल्या ११ वर्षांत सुमारे ६ लाख कोटी रुपये किमतीची संरक्षणसामुग्री, स्वदेशी कंपन्यांकडून खरेदी केल्या ठेली. या ११ वर्षांत देशातील संरक्षण उत्पादन दुपटीहून अधिक वाढून, आता १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. याच काळात संरक्षण क्षेत्राशी संबंधित १५० पेक्षा जास्त नवे स्टार्टअप्स सुरू करण्यात आले आहेत.

### थेट परदेशी गुंतवणूक (एफडीआय) धोरणामध्ये बदल

२०२० मध्ये संरक्षण क्षेत्रात थेट परदेशी गुंतवणूक मर्यादेत बदल करण्यात आला. नवीन संरक्षण औद्योगिक परवाना घेऊ इच्छिणाऱ्या कंपन्यांसाठी स्वयंचलित मार्गामार्फत (सरकारकडून किंवा कोणत्याही विभागाकडून आगाऊ परवानगी घेण्याची आवश्यकता नसणे) एफडीआयची मर्यादा ७४% पर्यंत वाढवण्यात आली. तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करु शकणाऱ्या कंपन्यांसाठी, सरकारी परवानगीच्या मार्गाने ही मर्यादा १००% पर्यंत करण्यात आली.

### एका दशकात, उत्पादनात १७४% आणि निर्यातीत ३० पट वाढ

भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेबाबतची वचनबद्धता आता अधिक स्पष्टपणे दिसून येते- कारण भारत एक प्रमुख शस्त्र आयातदार देश म्हणून ओळखला जात होता, पण आता तो स्वदेशी उत्पादनाचे एक उदयोन्मुख केंद्र म्हणून समोर येत आहे. आज भारत आपल्या गरजांच्या सुमारे ६५% संरक्षण उपकरणे देशांतर्गत पातळीवरच तयार करत आहे. 'मेक इन इंडिया उपक्रमाचा एक भाग म्हणून 'धनुष' तोफ प्रणाली, एडव्हान्स्ड टोडड आर्टिलरी गन सिस्टम (ATAGS) ही अत्याधुनिक जमीनीवरून चालणारी (टोइड) तोफगोळा प्रणाली, मुख्य रणगाडे (मेन बॅटल टँक-MBT) अर्जुन, हलकी लढाऊ विमाने (LCA) तेजस, पाणबुड्या, मध्यम क्षमतेच्या युद्धनौका (फ्रिगेट्स), छोटी पण वेगवान

बहुउद्देशीय युद्धनौका (कॉरवेट्स), आणि अलीकडेच भारतीय नौदलात समाविष्ट झालेली INS विक्रांत युद्धनौका यांसारखी प्रमुख संरक्षण आयुधे आणि लष्करी साहित्य विकसित करण्यात आले आहेत. हे भारताच्या संरक्षण क्षेत्रातील वाढत्या क्षमतेचे प्रतीक आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताने सुमारे १०० देशांमध्ये विविध प्रकारची संरक्षण उत्पादने- जसे दारुगोळा, शस्त्रास्त्रे, प्रणाली, उपप्रणाली आणि त्यांचे सुटे भाग- यांची यशस्वी निर्यात केली आहे. भारताकडून संरक्षण उत्पादनांची सर्वाधिक आयात करणाऱ्या तीन प्रमुख देशांमध्ये अमेरिका, फ्रान्स आणि आर्मेनिया यांचा समावेश होतो. गेल्या दहा वर्षात भारताच्या संरक्षण उत्पादनात झालेली सुमारे १७४ टक्के वाढ, आणि त्या संबंधित निर्यातीत झालेली ३० पटीहून जास्त वाढ. स्वदेशी संरक्षण उत्पादनाला सर्वोच्च प्राधान्य देत सुरू झालेल्या या मोहिमेची यशोगाथा सांगते. याच आत्मविश्वासासह पुढे जात, भारताने २०२९ पर्यंत ३ लाख कोटी रुपयांपर्यंत संरक्षण उत्पादन करण्याचे आणि ५०,००० कोटी रुपयांपर्यंत संरक्षण साहित्य निर्यात करण्याचे ध्येय निश्चित केले आहे.

- सार्वजनिक क्षेत्रातील १६ हून जास्त उपक्रम, भारतात संरक्षण संबंधित उत्पादने तयार करत आहेत.
- ४३० हून जास्त कंपन्यांना, संरक्षण उत्पादनासाठी परवाने देण्यात आले आहेत.
- १६ हजाराहून जास्त सूक्ष्म मध्यम लघुउद्योग (एमएसएमई), संरक्षण उत्पादन क्षेत्रात कार्यरत आहेत.

## रणनीतिक क्षेत्रात मेड इन इंडिया ड्रोनचा धडाका

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतातील ड्रोनचा बोलबाला सर्वत्र होता. या यशाचे श्रेय देशांतर्गत संशोधन-विकास आणि धोरणात्मक सुधारणांना जाते. २०२१ पासून हरोनच्या आयातीवर बंदी आणि पीएलआय (उत्पादनानुसार प्रोत्साहन योजना) यामुळे या क्षेत्रात झपाट्याने नवोन्मेषाळा चालना मिळाली आहे. २०३० पर्यंत सुमारे ११ अब्ज डॉलर्सच्या जागतिक बाजारात १२.२ टक्के हिरसा मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवून भारत, ड्रोन उत्पादनाचे एक प्रमुख जागतिक केंद्र बनण्याच्या दृष्टीने वाटचाल करत आहे. भारतातील अल्फ डिझाईन टेक्नॉलॉजी ही कंपनी, इस्त्रालच्या एल्बिट सिस्टिम्स या कंपनीसह, स्टार स्ट्राइक प्रकारचे ड्रोन तयार करत आहे. टाटा ॲडव्हान्स, पारस डिफेन्स आणि आयजी ड्रोन या कंपन्या, भारतात प्रमुख ड्रोन उत्पादक म्हणून पुढे आल्या.

### स्वार्म ड्रोन

हे ड्रोन शत्रूच्या संरक्षण व्यवस्थेला चकवा देण्यात सक्षम असून, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने सुसज्ज असतात. हे विविध कोनांतून एकाच वेळी लक्ष्यावर हल्ला करण्याची क्षमता बाळगतात. डीआरडीओने खासगी कंपन्यांच्या सहकार्याने या स्वार्म ड्रोनच्या विकासावर काम केले आहे.

### शत्रूच्या भागावर नजर ठेवणारे ड्रोन



हे ड्रोन, शत्रूच्या भागावर सातत्याने नजर ठेवण्यासाठी वापरले जातात. भारताकडे सध्या लांब पल्ल्याच्या सर्विलन्ससाठी, तापस बीएच-२०१ आणि रुस्तम हे स्वदेशी ड्रोन आहेत. रुस्तम ड्रोन, संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने विकसित केला आहे. याशिवाय, इस्रायलचे हेरोन ड्रोनसुद्धा भारताच्या ताफ्यात समाविष्ट आहेत.

### आत्मघातकी ड्रोन

हे ड्रोन शत्रूच्या ठिकाणांवर घिरट्या घालतात आणि लक्ष्याची अचूक ओळख पटल्यावर त्यावर जाऊन धडकत स्फोट घडवतात. भारत सध्या स्वदेशात खासगी कंपनीने विकसित केलेल्या नागास्त्र ड्रोनसह, पोलिश बनावटीच्या वार्मेट ड्रोनचा वापर करत आहे.

### आर्म्स कॉम्बॅट ड्रोन

अनमॅन्ड कॉम्बॅट एरियल व्हीकल (UCAV) म्हणून ओळखले जाणारे हे मानवविरहित लढाऊ हवाई हल्लेखोर ड्रोन, क्षेपणास्त्र सोडण्याची आणि शत्रूच्या ठिकाणी अचूकपणे बॉम्ब टाकण्याची क्षमता बाळगतात. या श्रेणीत भारताकडे डीआरडीओने विकसित केलेला 'घातक' ड्रोन आणि इस्रायली बनावटीचा 'हेरोप' ड्रोन उपलब्ध आहे.

### स्वदेशी शस्त्रांनी दाखवली ताकद



धोरणात्मक सुधारणा, खाजगी क्षेत्राचा सहभाग आणि मजबूत संशोधन आणि विकास यामुळे आयएनएस विक्रांत, धनुष आर्टिलरी गन सिस्टम, ॲडव्हान्स्ड टोड आर्टिलरी गन सिस्टम (एटीएजीएस), मेन बॅटल टँक (एमबीटी) अर्जुन, लाइट स्पेशलिस्ट व्हेइकल्स, हाय मोबिलिटी व्हेइकल्स, तेजस, लढाऊ हेलिकाप्टर प्रचंड, वेपेन लोकेटिंग रडार, उडी टॅक्टिकल कंट्रोल रडार आणि सॉफ्टवेअर डिफाईन्ड रेडिओ यासारख्या प्रगत लष्करी प्लॅटफॉर्मचा विकास होण्याबरोबरच विनाशिका, स्वदेशी विमानवाहू जहाजे, पाणबुड्या, फ्रिगेट्स, कॉर्वेट्स, जलद गस्त जहाजे, जलद हल्ला जहाजे आणि ऑफशोअर गस्त जहाजे यांच्यामुळे भारताच्या सामरिक क्षमतांमध्ये एक नवीन अध्याय खुला झाला आहे. त्याच वेळी, ऑपरेशन सिंदूर दरम्यान, आकाशसारख्या स्वदेशी हवाई संरक्षण प्रणालींसह, पिकोरा, ओएसए-एके सारख्या युद्ध प्रमाणित हवाई संरक्षण प्रणाली आणि खांद्यावर चालवल्या जाणाऱ्या खालच्या स्तरावरील हवाई संरक्षण तोफांनी आपली ओळख निर्माण केली आहे.

### आकाश क्षेपणास्त्र प्रणाली

डीआरडीओने विकसित केलेल्या आकाश क्षेपणास्त्र प्रणालीची निर्मिती भारत डायनॅमिक्स लिमिटेडतर्फे केली जाते. ही प्रणाली एकाच वेळी ४ लक्ष्यांचा वेध घेऊ शकते. त्याचे क्षेपणास्त्र १८ हजार मीटर उंचीवर ४५ किलोमीटर अंतरावरील विमानांना लक्ष्य करू शकते. त्यात लढाऊ विमाने, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि हवेतून जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे तसेच बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे यांसारख्या हवाई लक्ष्यांना निष्प्रभ करण्याची क्षमता आहे. हे भारताला इस्रायलच्या आयर्न डोमपेक्षाही मोठे संरक्षण कवच उपलब्ध करून देते.

### ब्राह्मोसचा धमाका




ऑपरेशन सिंदूरसोबतच भारताच्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा धमाका जगभर ऐकू आला. जमीन, हवा आणि समुद्र अशा तिन्ही प्रकारे डागता येणारे हे क्षेपणास्त्र रडारच्या आवाक्याबाहेर राहून अतिशय वेगाने चकवा देत लक्ष्यावर अचूक मारा करू शकते. ऑपरेशन सिंदूरनंतर अनेक देशांनी ब्राह्मोसची मागणी केली आहे.

### इस्त्रोच्या उपग्रहाने देखरेखीस केली मदत

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्त्रो) १० उपग्रह भारताच्या सीमेचे सतत निरीक्षण करत असतात. ड्रोन आणि क्षेपणास्त्र तंत्रज्ञानातील समन्वयाचे कामही त्यांच्यामुळे सोपे होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान लक्ष्यांवर अचूक मारा करण्यापासून ते देखरेखीपर्यंत या उपग्रहांनी सैन्याला मदत केली.

### डी४ अँटी ड्रोन सिस्टम

डीआरडीओने विकसित केलेली ही प्रणाली जॅमिंगच्या मदतीने शत्रूच्या ड्रोनना निष्क्रिय करते. त्याला जोडलेले रडार, आरएफ आणि सेन्सर्स ३६० अंशाच्या कोनात काम करतात. यात सर्वात कठीण ड्रोन नष्ट करण्यासाठी लेजर किल मोड देखील आहे. या प्रणालीच्या मदतीनेच भारताने पाकिस्तानने सोडलेले ड्रोन खाली पाडले.

### जगाला पाकिस्तानचा खरा चेहरा दाखविण्यासाठी पुढाकार

केंद्र सरकारच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून, भारताच्या ऑपरेशन सिंदूरचे उद्दिष्ट आणि दहशतवाद्यांचे आश्रयस्थान असलेल्या पाकिस्तानचा खरा चेहरा जगासमोर उघड करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांच्या ५९ खासदारांच्या ७ पथकांना वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवण्यात आले. या ७ संघांमध्ये ७ माजी राजदूतांचा समावेश आहे. २० मे रोजी परराष्ट्र सचिव मिसरी यांनी शिष्टमंडळातील सर्व सदस्यांना सविस्तर माहिती दिली. ■

## मिशन बाल भरारी: ग्रामीण शिक्षणाला 'ए आय' चे पंख

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर येथे महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांच्या 'मिशन बाल भरारी' या अनोख्या उपक्रमाचे उद्घाटन संपन्न झाले. या उपक्रमाअंतर्गत भारतातील पहिली I–सक्षम अंगणवाडी वडधामना (ता. हिंगणा, जि. नागपूर) येथे सुरू करण्यात आली आहे. या अंगणवाडीत मुलांना कविता, गाणी आणि अभ्यासक्रम हे VR हेडसेट्स, I–संलग्न स्मार्ट डॅशबोर्ड आणि इंटरॅक्टिव्ह डिजिटल माध्यमांच्या साहाय्याने शिकवले जाणार आहे. या उपक्रमाअंतर्गत आणखी ४० I–सक्षम अंगणवाड्या उभारण्याचे उद्दीष्ट आहे. ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करून प्रत्येक बालकाला जिज्ञासेने, आनंदाने आणि आत्मविश्वासाने शिकण्याची संधी मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ■

## महिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल'

**ग्रामीण** भागातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या 'उमेद–महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना'अंतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. योजनेसाठी एकूण २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील महिलांतील उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी सुरू झालेल्या स्वयं सहाय्यता समूहांच्या (SHG) विविध उत्पादनांना स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठ मिळावी या उद्देशाने हे केंद्र उभारले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यांमध्ये हे मॉल कार्यान्वित करण्यात येणार असून, नंतर टप्प्याटप्प्याने ही योजना इतर जिल्ह्यात विस्तारली जाणार आहे. प्रत्येक उमेद मॉलसाठी कमाल २० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, हे मॉल जिल्हा परिषदेच्या जमिनीवर उभारण्यात येतील. मॉलमध्ये प्रत्येक गटाला चक्राकार पद्धतीने गाळे उपलब्ध करून दिले जातील. ■

## सप्टेंबर २०२५ पर्यंत ५००० मेगावॅटचे प्रकल्प पूर्ण करा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' संदर्भात आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस स्पष्टपणे सांगितले की, 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' ही माझी अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून सप्टेंबर २०२५ पर्यंत ५००० मेगावॅट सौर ऊर्जेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी योजनेतील कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होता कामा नये. राज्यातील सर्व कार्यान्वयन यंत्रणांनी ही कामे गतीने, समन्वयाने आणि कालबद्ध नियोजनानुसार पूर्ण करावीत, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. जिल्हास्तरीय टास्क फोर्सने योजनेतील प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा. तसेच ना–हरकत प्रमाणपत्र आणि विकासकांना येणाऱ्या अडचणी प्राधान्याने सोडवाव्यात. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सप्टेंबर २०२५ पर्यंत ५००० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी कामांमध्ये कोणतीही दिरंगाई होता कामा नये. राज्यातील सर्व कार्यान्वयिन यंत्रणांनी ही कामे गतीने आणि कालबद्ध नियोजनानुसार पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत दिले. पर्यायी जमिनींचे भाडेपट्टा करार, पीक अतिक्रमण हटवणे, कायमस्वरूपी संरचनांचे अतिक्रमण काढणे, रस्त्यांची पुनर्बांधणी करणे तसेच जमिनीचे मोजमाप आणि सीमांकन वेळेत पूर्ण करणे ही कामे जिल्हाधिकारी यांनी प्राधान्याने पार पाडावी. ग्रामपंचायतींकडून ना–हरकत प्रमाणपत्रे मिळवणे, सौर प्रकल्पांच्या साहित्याची चोरी झाल्यास पोलीस विभागाने तत्काळ कायदेशीर कारवाई करणे, दाट लोकवस्तीच्या भागात काम करताना योग्य खबरदारी घेणे आणि झाडे तोडताना पर्यावरणपूरक मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करणे या बाबींना गांभीर्याने हाताळले पाहिजे. जर वीजवाहिनी वनक्षेत्रातून जात असेल तर वन विभागाने परवानग्यांची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. तसेच खाजगी जमिनी किंवा वन विभागाच्या मालकीच्या जमिनींवरील प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या ना–हरकत परवानग्या विहित वेळेत दिल्या जाव्यात, याकडेही त्यांनी विशेष लक्ष वेधले. ■



राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) गटाचे ज्येष्ठ नेते अण्णा डांगे यांचा त्यांच्या दोन पुत्रांसह भाजपात प्रवेश- उपस्थिती- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, आ. सुरेश खाडे, आ. सुधीर गाडगीळ, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माधवी नाईक, पृथ्वीराज देशमुख, जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, सांगली शहर जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश प्रवक्ते अवधूत वाघ, माध्यम विभागप्रमुख नवनाथ बन आदी.




जालन्याचे माजी आमदार कैलाश गोरंट्याल यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, रावसाहेब दानवे-पाटील, बहुजन विकास मंत्री अतुल सावे, खा. अशोक चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



लातूर जिल्ह्यातील चाकूर नगरपंचायतीचे माजी अध्यक्ष व प्रहारचे नेते कपील माकणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शरद पवार गटाचे निळकंठ मिरकले यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. संभाजी पाटील-निलंगेकर, अर्चना पाटील-चाकुरकर, मराठवाडा विभागीय संघटनमंत्री संजय कोडगे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



काँग्रेसचे माजी आमदार सुरेश वरपुडकर यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना बोर्डिकर, आ. तान्हाजी मुटकुळे, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. संजय केनेकर, माधवी नाईक आदी.



नाशिक येथील शिवसेना ठाकरे गटाचे सुनील बागुल व मामा राजवाडे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, आ. मंगेश चव्हाण आदी.



वर्धा–पिंपरी मेघे ग्रामपंचायतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) गटामधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपा परिवारात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. समीर कुणावार, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते आदी.



चंद्रपूर येथील उबाठाचे जिल्हाप्रमुख आणि जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक रवींद्र शिंदे, उबाठाचे पंचायत समितीचे माजी सभापती वासुदेव ठाकरे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आ. बंटी भांगडिया, आ. किशोर जोरगेवार, आ. करण देवतळे आदी.



श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक सुभाषराव काळाने, बेलवंडीचे माजी सरपंच उत्तमराव डाके, तांदळी दुमालाचे सरपंच संजय निगडे यांचा अनेक कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. विक्रमसिंह पाचपुते, तालुकाध्यक्ष विक्रम भोसले, शहराध्यक्ष धनराज कोथिंबिरे आदी.




डोंबिवलीतील काँग्रेसचे विश्वास उर्फ बाळा सावंत, शशिकांत चौधरी, मनसेचे विजय विवेक शिंदे, मनोज आंग्रे, सुभाष कदम, मनीष मोरे, नम्रता देसाई, सचिन ताम्हणकर, राजेश भोईर, मिलिंद उर्फ कपिल कांबळे, डोंबिवलीतील साईनाथ महिला मंडळाचे सदस्य तसेच काँग्रेस व मनसेच्या असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, पवन पाटील, प्रिया जोशी, मितेश पेणकर, नंदू जोशी, समीर चिटणीस, प्रदीप चौधरी, विद्या राजेश म्हात्रे, डॉ. सर्वेश सावंत, प्रशांत पाटेकर, हर्षद सुर्वे, युवा मोर्चा अध्यक्ष कृष्णा पाटील आदी.




सासवड–पुरंदरचे काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, प्रदेश संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे, बाबा जाधवराव आदी.



चाळीसगाव (जि. जळगाव) येथील राष्ट्रवादी (श. प.) गटाचे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भूषण काशिनाथ पाटील, माजी उपनगराध्यक्ष भगवान बापू पाटील यांच्यासह दीपक कच्छवा, दीपक पवार, उदय वाघ, हितेश व्यास यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. मंगेश चव्हाण, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तसेच जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व अर्थ सभापती दिनकर दहिफळे, किनवट बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे यांच्यासह ८ संचालक आणि राष्ट्रवादी (श.प.) गटातील प्रदेश युवक सचिव अजित साबळे, किनवट बाजार समितीचे संचालक श्रीराम कांदे, युवक तालुका अध्यक्ष तसेच किनवट बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे, सुनील घुगे, प्रल्हाद सातव, प्रेमसिंग साबळे, कैलास बिज्रमवार, विद्या दासरवार, कुसुम मुंडे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, खा. अशोक चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. डॉ. तुषार राठोड, नांदेड महानगर जिल्हाध्यक्ष अमरनाथ राजुरकर, नांदेड उत्तर अध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.

# महाराष्ट्रातील संघटनात्मक कामाचा आढावा पंतप्रधानांना सादर





**भारतीय** जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नुकतीच नवी दिल्लीत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत महाराष्ट्र भाजपाची संघटनात्मक घडामोडी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन व पक्षवाढीची दिशा याबाबत सविस्तर माहिती त्यांनी पंतप्रधानांना दिली. या भेटीत चव्हाण यांनी 'कार्य विस्तार अभियान' संदर्भातील विशेष पुस्तिका पंतप्रधानांना सादर केली. या पुस्तकात महाराष्ट्रात बूथ पातळीवर सुरू असलेले संघटनकार्य, सदस्य नोंदणी मोहिम, पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, संपर्क अभियान आणि महिला–युवा आघाड्यांच्या उपक्रमांचा सविस्तर आढावा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्री. चव्हाण यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ■

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com